दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com
• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४७ | रविवार दि.०४ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### २०२६ : महिला शेतकऱ्यांना समर्पित !

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले आहे. शेती व अन्न प्रणालीमधील महिलांच्या मोलाच्या पण दुर्लक्षित योगदानाची दखल घेण्यासाठी आणि दीर्घकाळ टिकून असलेली लैंगिक विषमता दूर करण्यासाठीच्या प्रयत्नांना गती देण्यासाठी हे वर्ष महिला शेतकऱ्यांना समर्पित करण्यात आले आहे.

# महासांगवीच्या केळीची इराणला गोडी थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत झेप





सतीश गर्जे । पाटोदा

**बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या कष्टाच्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर शेतीमध्ये क्रांती घडवून आणली आहे. महासांगवी येथील तरुण शेतकरी प्रमोद नवनाथ गर्जे यांच्या शेतातील केळीने आता थेट सातसमुद्रापार इराणच्या बाजारपेठेत धडक मारली आहे. या यशामुळे स्थानिक केळी उत्पादकांसाठी जागतिक बाजारपेठेची दारे उघडली गेली असून, परिसरात आनंदाचे वातावरण आहे.**

### » इराणला निर्यात आणि नव्या संधी

या केळीची प्रत आंतरराष्ट्रीय दर्जाची असल्याने ती थेट इराण देशात निर्यात केली जात आहे. ''शेतीत केवळ पारंपरिक पिके घेऊन चालणार नाही, तर नवनवीन प्रयोग केले पाहिजेत. बाजाराची गरज ओळखून उत्पादन घेतल्यास जागतिक बाजारपेठ गाठणे कठीण नाही,'' असे मत प्रमोद गर्जे यांनी व्यक्त केले.

प्रमोद गर्जे यांनी आपल्या ७० गुंठे क्षेत्रात ठिबक सिंचनाचा वापर करून केळीची लागवड केली. ७ बाय ५ फूट या अंतरावर त्यांनी एकूण २००० रोपे लावली होती. एका रोपासाठी साधारण १५० रुपयांपर्यंत खर्च आला असून, पिकाच्या वाढीसाठी खतांचे व सूक्ष्मद्रव्यांचे अचूक नियोजन त्यांनी सुरुवातीपासूनच केले होते. विशेष मशागत आणि नियोजनामुळे केळीच्या एका गडाचे वजन सरासरी २५ किलोपर्यंत भरले आहे. या दर्जेदार मालाची गुणवत्ता पाहून आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांनी या केळीला १७ रुपये प्रति किलो इतका भाव दिला आहे. खतांमध्ये प्रामुख्याने १२:६१:००, १३:००:४५ यांसारखी विद्राव्य खते, सूक्ष्मद्रव्ये (बोरॉन, झिंक),

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### आता रांगेविना घ्या औंढा नागनाथाचे दर्शन

औंढा नागनाथः देशातील आठवे ज्योतिर्लिंग असलेल्या औंढा नागनाथ येथे आता पूजा, अभिषेक व दर्शनासाठी भाविकांना रांगेत उभे राहण्याची गरज भासणार नाही. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या पुढाकारातून देवस्थानची अधिकृत वेबसाईट सुरू करण्यात आली असून त्याद्वारे ऑनलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. देशातील एकमेव भूमिगत ज्योतिर्लिंग अशी ओळख असलेल्या औंढा नागनाथ मंदिरात दरवर्षी सुमारे २५ लाख भाविक दर्शनासाठी येतात. देशभरातून मोठ्या प्रमाणावर भाविक येत असतानाही येथे पुरेशा सुविधा व ऑनलाईन बुकिंग व्यवस्था नसल्यामुळे दर्शन व पूजा–अभिषेकासाठी भाविकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.

### अमेरिकेचा व्हेनेझुएलावर हल्ला

दिल्लीः अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शनिवारी दावा केला की, काराकासवर झालेल्या मोठ्या प्रमाणावरील हवाई हल्ल्यानंतर व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला अमेरिकन सैन्याने ताब्यात घेतले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचा हा दावा व्हेनेझुएलाच्या राजधानीत अनेक स्फोटांनी देश हादरल्यानंतर काही तासांनी समोर आला, ज्यामुळे देशात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. आपल्या 'ट्रुथ सोशल'वरील एका पोस्टमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, अमेरिकेने ''व्हेनेझुएला आणि त्याच्या नेत्याविरुद्ध एक मोठा हल्ला यशस्वीपणे केला आहे'', आणि पुढे सांगितले की, मादुरो आणि त्यांची पत्नी, सिलिया फ्लोरेस यांना ताब्यात घेऊन अमेरिकन कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांसोबत केलेल्या कारवाईत देशाबाहेर पाठवण्यात आले आहे.

### मुंबई वगळता इतर ठिकाणी रिपाइंचा महायुतीला पाठिंबा

मुंबईः भाजपने मुंबईत कोणत्याही जागा न सोडल्याने रिपाइंने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, भाजपशी मैत्रीपूर्ण लढती होतील असे सांगत अन्य सर्वत्र महायुतीला रिपाइंचा पाठिंबा असल्याचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी घोषित केले. महायुतीला संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे. जेथे महायुतीचे एकत्रित उमेदवार आहेत तेथे आम्ही त्यांच्याबरोबर आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. भाजप व शिंदे सेनेचे उमेदवार समोरासमोर उभ्या असलेल्या वार्डांमधील रिपाइंची भूमिका मात्र अद्याप स्पष्ट झालेली नाही. गेल्या काही दिवसांपासून महायुतीत मुंबईत एकत्र जागावाटप झाले तरी रिपाइंला जागा मिळाल्या नाहीत. याबद्दल मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली जात होती. ती दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रामदास आठवले यांच्या स्वतंत्र बैठकाही घेतल्या.

### ५०० रुपयांच्या नोटा बंद होणार नाहीत – सरकार

दिल्लीः मार्च २०२६ पासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ५०० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करणार असून एटीएममधूनही या नोटा मिळणार नाहीत, असा दावा सोशल मीडियावरून केला जात आहे. मात्र, केंद्र सरकारच्या 'पीआयबी' फैक्ट चेक टीमने हा दावा पूर्णपणे खोटा आणि दिशाभूल करणारा असल्याचे स्पष्ट केले आहे.

# शरद पवारांसह महाराष्ट्रातील सात खासदार होणार निवृत्त

मुंबई । प्रतिनिधी

**२०२५ हे वर्ष राजकीय घडामोडी पाहता अत्यंत महत्वाचे वर्ष ठरले आहे. आता २०२६ हे नवीन वर्ष सुरू झाले असून, या वर्षात पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांकडे सगळ्यांचे लक्ष असणार आहे. दुसरीकडे राज्यसभेतील २४५ खासदारांपैकी ७१ खासदारांचा कार्यकाळ याच वर्षात संपणार असून ते निवृत्त होणार आहेत. या खासदारांमध्ये महाराष्ट्रातील सात खासदारांचा समावेश आहे.**



सगळ्यात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या राजकारणातील मोठे नाव राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा देखील यामध्ये समावेश असून, त्यांच्यासह महाराष्ट्रातील सात खासदारांचा कार्यकाळ संपणार आहे. विशेष म्हणजे सातही राज्यसभेचे खासदार २ एप्रिल २०२६ मध्ये निवृत्त होणार आहेत. राज्यसभेतून निवृत्त होणारे खासदार केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपचे माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचा समावेश असून, याशिवाय शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, काँग्रेसच्या खासदार रजनी पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या खासदार डॉ. फौजिया खान हे सर्वजण

▶▶ पान २ वर

# राज्यात प्रचाराची रणधुमाळी; फडणवीस घेणार ११ दिवसात ३५ सभा

मुंबई । प्रतिनिधी

**महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवारी संपल्याने लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. आता प्रचाराची खरी रणधुमाळी सुरू होणार आहे. या निवडणुकीत काही ठिकाणी युती आणि आघाडी एकत्र आली असून, काही महापालिकांमध्ये ते एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येत्या १३ जानेवारीपर्यंत साधारणतः ३५ सभांना संबोधित करणार आहेत. राज्यातील प्रत्येक महापालिकेच्या ठिकाणी ते प्रचारासाठी जाणार आहेत.**



महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत शुक्रवारी संपल्याने लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. शनिवारी उमेदवारांना चिन्ह वाटप होणार असल्याने आता प्रचाराची खरी रणधुमाळी सुरू झाली आहे. मुंबई, ठाणे, कल्याण – डोंबिवली, कोल्हापूर, नागपूर, वसई – विरारसह जवळपास ११ महापालिकांमध्ये भाजपा आणि शिवसेना युती झाली आहे. तर दोन महापालिकांमध्ये या युतीसोबत अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आहे. या निवडणुकीत मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवलीमध्ये भाजपा – शिवसेना युती विरुद्ध उद्धव आणि राज ठाकरे यांची शिवसेना आणि

▶▶ पान २ वर

# मराठी दशावतार' ची ऑस्कर भरारी!

## १५० चित्रपटांमध्ये निवड

पुणे । प्रतिनिधी

'दशावतार' सिनेमाच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. ९८ व्या ऑस्कर पुरस्कारांच्या मुख्य स्पर्धेत या चित्रपटाची अधिकृत निवड झाली आहे. जगभरातील हजारो चित्रपटांतून निवडल्या गेलेल्या १५० चित्रपटांमध्ये स्थान मिळवणारा हा एकमेव मराठी चित्रपट ठरला आहे. याबाबत आता दिग्दर्शक सुबोध खानोलकर यांनी पोस्ट शेअर करत भावना व्यक्त केल्या आहेत.

दिलीप प्रभावळकर यांची मुख्य भूमिका असलेल्या 'दशावतार' सिनेमाने २०२५ मध्ये बॉक्स ऑफिसवर रेकॉर्डब्रेक कमाई केली होती. २०२५ मध्ये हा सर्वाधिक कमाई करणार मराठी चित्रपट ठरला होता. कोकणच्या लाल मातीतील कला आणि कलेवर जीवापाड प्रेम

▶▶ पान २ वर

# जनतेचे आशीर्वाद व प्रेम आहे तोपर्यंत कुणी माझे काही बिघडवू शकत नाही -धनंजय मुंडे

परळी प्रतिनिधी

अनेक लोक आपली चांगल्या कामांमुळे ओळख ठेवतात. परळी विधानसभेची निवडणूक मी प्रचंड बहुमतांनी विजयी झाल्यानंतर अनेकांनी मला खाली ओढण्याचा, राजकारणातून संपवण्याचा प्रयत्न केला, मात्र या भागातील जनतेचे प्रचंड प्रेम व आशीर्वाद जोपर्यंत माझ्या पाठीशी आहेत तोपर्यंत माझे कुणी काही बिघडवू शकत नाही; असे उद्‌गार माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील जिजामाता विद्यालयात बोलताना काढले आहेत.




धर्मापुरी येथील इंद्रायणी प्रतिष्ठान व सरस्वती नागरगोजे प्रतिष्ठान यांच्यावतीने जिजामाता माध्यमिक विद्यालय येथे शिक्षण महर्षी गौतमराव बापू नागरगोजे तसेच

▶▶ पान २ वर

# सह्याद्री वनराईला दुसऱ्यांदा आग

## सयाजी शिंदेंचा संताप; अजित पवारांना भेटणार

बीड । प्रतिनिधी

अभिनेते सयाजी शिंदे यांनी बीडमध्ये उभारलेल्या देवराई प्रकल्प परिसरात मागील पंधरा दिवसात दोन वेळा आग लागण्याचा प्रकार समोर आला आहे. या संदर्भात सयाजी शिंदे पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेणार असल्याची माहिती त्यांनी स्वतः दिली. आधीच झाडांची संख्या कमी आहे, त्यामुळेच मोठ्या संख्येने झाडे लावण्यात आली असून, ही झाडें जाळण्याचा जाणीवपूर्वक प्रकार होत आहे, असे सयाजी शिंदे म्हणाले.

पहिल्यांदा आग लागली तेव्हा १००-१५० झाडं जळाली होती, आता पुन्हा एकदा आग लागण्यात आली असून, गेल्या ७ वर्षांपूर्वी लावलेली झाडं जाळण्यात आली आहेत. दिवसाढवळ्या सकाळी ११ वाजता तीन ठिकाणी आग लावण्यात आली आहे, असे सयाजी शिंदे यांनी म्हटले. तसेच, आमची माणसं आणि वन विभागाचे अधिकारीही तेथे काम करत आहेत. त्यामुळे, या घटनांना आळा

▶▶ पान २ वर




# भारतात महिला कैद्यांची संख्या चिंताजनक

## अमेरिका आणि चीन महिला गुन्हेगारीत अग्रेसर

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**भारताची लोकसंख्या ३० टक्क्याने वाढली आहे एका संस्थेने केलेल्या सर्वेनुसार पुरुष कायद्यांची संख्या अधिक असली तरी भारतात महिला कैद्यांची संख्या चिंतनाचा विषय झाला आहे. देशभरात केलेल्या सर्वेनुसार अमेरिका आणि चीनमध्ये एक लाखापेक्षा अधिक महिला कैद्यांची संख्या आहे त्यात भारतातील महिला कायद्यांची संख्याही चिंतेचा विषय बनत आहे.**

महिला कैद्यांच्या वाढत्या संख्येने आता चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. 'इन्स्टिट्यूट फॉर क्राइम अँड जस्टिस पॉलिसी रिसर्च'च्या ताज्या 'वर्ल्ड फिमेल इम्प्रिझनमेंट लिस्ट' अहवालानुसार, दोन दशकांत भारतीय तुरुंगांत महिलांच्या संख्येत वाढ होण्याचा वेग पुरुषांच्या, सामान्य लोकसंख्या वाढीपेक्षा दुप्पट आहे. महिला कैद्यांच्या संख्येत भारत जगात सहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याआधी अमेरिका, चीन, ब्राझील, रशिया व थायलंडचा समावेश होतो. अहवालातील आकडेवारीनुसार, २००० ते २०२२ दरम्यानची भारतीय तुरुंगांमधील



### महिला कैद्यांची संख्या

**अमेरिका १,७४,६०७, चीन १,४५,०००, ब्राझील ५०,४४१, भारत २३,७७२.**

महिला कैद्यांची (न्यायाधीन आणि शिक्षा झालेले दोन्ही) स्थिती खालीलप्रमाणे आहे. २००० साली ही संख्या ९,०८९ होती, जी २०२२ पर्यंत २३,७७२ वर पोहोचली आहे (अंदाजे १६२% वाढ). याच काळात पुरुष कैद्यांची संख्या ३,१०,३१० वरून ५,४९,३५१ झाली आहे (एकूण ७७% वाढ). या काळात भारताची एकूण लोकसंख्या अंदाजे ३०% नी वाढली आहे. महिला कैद्यांच्या संख्येत अमेरिका १,७४,६०७, चीन १,४५,०००, ब्राझील ५०,४४१,भारत २३,७७२ एवढी आहे. म्हणजे महिला गुन्हेगारीत अमेरिका सर्वात पुढे असल्याचे या सर्व्हेक्षणातून दिसून आले. त्यातही भातात या पूर्वी संख्या कमी होती तिची आता काहीशी वाढल्याचे दिसत आहे.

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १९.०० क्विंटल | २,४०० | २,८२६ | २,५९६ |
| ज्वारी/हायब्रिड : ४८.५० क्विंटल | २,८७० | ३,८१० | ३,२८३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १६.०० क्विंटल | ५,६०१ | ६,७०० | ६,३१७ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,००१ | ५,७५० | ४,८८४ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,४८१ | ३,१२० | २,९८४ |
| मुग: १.०० क्विंटल | ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |
| सोयाबीन: १५७.०० क्विंटल | ४,५५१ | ४,७२१ | ४,६८१ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ४,३०० | ५,४१० | ४,९६५ |

## अग्रलेख

# २०२६ : महिला शेतकऱ्यांना समर्पित !

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घाषित केले आहे. शेती व अन्न प्रणालीमधील महिलांच्या मोलाच्या पण दुर्लक्षित योगदानाची दखल घेण्यासाठी आणि दीर्घकाळ टिकून असलेली लैंगिक विषमता दूर करण्यासाठीच्या प्रयत्नांना गती देण्यासाठी हे वर्ष महिला शेतकऱ्यांना समर्पित करण्यात आले आहे. महिला शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांकडे जगाचे लक्ष वेधणे, धोरणात्मक सुधारणांना चालना देणे आणि गुंतवणूक वाढवणे, ही प्रमुख उदिष्टे आहेत. जगभरात अन्न उत्पादन आणि ग्रामीण विकासामध्ये महिलांची भूमिका केंद्रस्थानी आहे. आशिया आणि आफ्रिकेतील छोट्या ते लॅटिन अमेरिका तसेच इतर प्रदेशातील ग्रामीण समुदायांपर्यंत लागवड, पशुपालन, अन्नप्रक्रिया आणि कुटुंबाच्या पोषणात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, परंतु त्यांच्या कामाचे योग्य मूल्यमापन केले जात नाही, जमिनीच्या मालकी हक्कापासून ते निर्णय प्रक्रियेपर्यंत सर्वच ठिकाणी त्यांना दुय्यम वागणूक दिली जाते. भारतातही हेच चित्र दिसते.

शेती आणि पूरक उद्योगात कुटुंचाच्या बरोबरीने महिलांचे स्थान महत्त्वाचे आहे. परंतु आजही त्यांच्या श्रमाला योग्य मूल्य नाही. त्यांच्या परिश्रमाची दखल घेतली जात नाही. काही ठिकाणचे अपवाद वगळता शेती आणि कुटुंबासाठी राबणाऱ्या या महिलांच्या नावावर आजही एखादा शेतीचा तुकडा नाही, निर्णय प्रक्रियेत महत्त्वाचे स्थानही नाही, खरे तर शेतीच्या शोधाची नोंदच महिलांच्या नावे आहे. भारतासह जगभरातील महिला या कुटुंब सांभाळत शेती तसेच दुग्धोत्पादन, शेळी-मेंढी-कुक्कुटपालन आदी पूरक व्यवसाय तसेच शेतीमाल प्रक्रिया उद्योगात मोलाचे योगदान देत आहेत. एवढेच नव्हे तर नोकरी, उद्योग, सेवा क्षेत्रासह राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात महिला उल्लेखनीय काम करीत आहेत. असे असतानाही प्रामुख्याने शेतीमधील त्यांचे योगदान नगभर दुर्लक्षित राहिले आहे. त्यामुळे लिंग समानतेबरोबर महिलांना त्यांचे हक्क, अधिकार देऊन त्यांना अधिकाधिक सक्षम करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने हे वर्ष शेतकरी महिलांना समर्पित केले आहे. म्हणजे आतापर्यंत दुर्लक्षित शेतकरी महिलांचा जागतिक पातळीवरील हा सर्वोच्च सन्मान म्हणावा लागेल, महिला ही फार मोठी ताकद आहे. ती सहनशील आहे, दु:ख झेलण्याची तिच्यात क्षमता आहे. असे असताना आपले हक्क, अधिकार आणि कर्तव्यासाठी महिलांचा संघर्ष चालूच आहे. ग्रामीण भागात महिला शेतकऱ्यांचा संघर्ष प्रकषनि जाणवतो. महिलांशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार होताना दिसत नाहीत. ग्रामीण भागात निर्णय प्रक्रियेत, आर्थिक व्यवहारात महिलांना सामावून घेतले जात नाही. शेतीचा सारा भार आपल्या माथी पेलणाऱ्या बहुतांश महिलांच्या नावे घर-शेती-पशुधन नाही. भारतात केवळ १३ टक्के महिलांची नोंद सातबारावर आहे. शेती व्यवसायाचे नियोजन, मुलाबाळांचे लग्नकार्य अशा निर्णय प्रक्रियेत महिलांना सहभागी करून घेतले जात नाही. शेतीत पुरुषांबरोबर काम करुनही महिलांना ३० टक्के मजुरी कमी दिली जाते. महिलांच्या नावे शेती, संपत्ती नसल्याने अनेक योजनांपासून त्यांना वंचित रहावे लागते. शेतीमध्ये महिलांना सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या तर उत्पादकतेत २० ते ३० टक्के वाढ होते, असा एक अहवाल सांगतो. तेव्हा ही सर्व विषमता दूर करण्याची एक चांगली संधी आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाच्या निमित्ताने लाभली आहे. शेतकरी महिलांना खऱ्या अथनि सक्षम करायचे असेल तर त्यांच्या वेतन अथवा मजुरीत होत असलेला स्त्री-पुरुष लिंगभेद प्रथम संपविला पाहिजे. शेतीतील बहुतांश कामे करणाऱ्या महिलांची नावे सातबारावर यायला हवोत. शेतीत निविष्ठा ते शेतमाल विक्रीपर्यंतच्या सर्व निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग असायला हवा, वैयक्तिक अथवा गटसमूहाच्या माध्यमातून शेतीमाल प्रक्रिया उद्योगात उतरलेल्या महिलांना त्यांच्या उद्योग-व्यवसायाबाबत संपूर्ण स्वातंत्र्य द्यायला हवे. एक महिला म्हणून त्यांचा कोणताही हक्क, अधिकार डावलण्यात येऊ नये. शेतकरी महिलांचे सशक्तीकरण करणे हे केवळ सामाजिक व्यवस्थेसाठीच चांगले आहे असे नाही, तर अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्याचाही तो एक मान्य मार्ग आहे. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाच्या पार्श्वभूमीवर देश आणि राज्यातील महिला शेतकऱ्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. राष्ट्रीय पातळीवर शेतीमधील रोजगाराच्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, शेतीमधील ७० टक्के भार हा महिलांच्या खांद्यावर आहे. महाराष्ट्रात हेच प्रमाण ८५ टक्के आहे. तरीसुद्धा आज या महिलांना कोणतेही निर्णयाचे अधिकार नाहीत, अथवा समन्मानजनक वागणूक नाही. त्यांचे प्रश्न दुर्लक्षित आहेत, शेतीविषयक बहुतांश योजना पुरुष शेतकऱ्यांना मिळतात. शेतीतील कष्टाच्या कामाचा ८५ टक्के भार महिलांवर असताना केवळ १५ टक्के महिला भूधारक आहेत, आजही कुटुंबाच्या शेतजमिनीचा मालकी हक्क महिलेला मिळालेला नाही.

डॉ. एम. एस. स्वामीनाथन राज्यसभेचे सदस्य असताना त्यांनी २०११ मध्ये महिला शेतकऱ्यांचे कायदेशीर अधिकार असा प्रस्ताव चर्चेसाठी मांडला होता. या प्रस्तावामध्ये महिलांना जमीन मालकी हक्क, शेतीसाठी लागणारे पाणी, इतर संसाधने आणि पुरक उद्यागात प्राधान्य तसेच आर्थिक सक्षमता या विषयावर भर दिला होता. परंतु त्यावर पुढे फारशी चर्चा झाली नाही, २०१६ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय महिला किसान दिन साजरा करण्यास सुरुवात केली. परंतु आजही केवळ कौतुक सोहळा असेच त्याचे स्वरूप आहे. खऱ्या अथनि महिला शेतकऱ्यांचे कष्ट आणि हक्काची जाणीव समाजाला करून द्यायची असेल तर केंद्र सरकारने महिला शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय अभियान सुरू करावे. डॉ. स्वामीनाथन यांनी मांडलेल्या प्रस्तावावर लोकसभा, राज्यसभेमध्ये धोरणात्मक चर्चा होऊन त्यासंबंधी कायदा मंजूर करावा.

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाच्या निमित्ताने विविध राज्यांतील महिला शेतकरी तसेच पूरक व्यवसाय आणि पूरक उद्योगांमध्ये कार्यरत महिलांपर्यंत नवीन तंत्रज्ञान जलदगतीने पोहोचविण्यावर भर द्यायला हवा.

## शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**बीड । पतिनिधी**

**शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात शनिवार दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी थोर समाजसेविका, स्त्री शिक्षणाच्या उद्धारिका व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.**



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक चव्हाण सर होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम, श्री गुजर सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच काही निवडक विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रभावी भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या भाषणांतून सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणप्रेमी विचारांचा, संघर्षमय जीवनाचा व समाज सुधारणे तील अमूल्य योगदानाचा सखोल आढावा घेण्यात आला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होऊन प्रेरणा मिळाल्याचे चित्र दिसून आले. विद्यार्थ्यांच्या मनोगता नंतर शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना वाव्हळ सर यांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार आत्मसात करून शिक्षणाच्या माध्यमातून स्वत:चा व समाजाचा सर्वांगीण विकास करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना चव्हाण सर यांनी सावित्रीबाई फुले यांचा संपूर्ण इतिहास मांडला व त्यांच्या विचारांवर प्रकाश टाकला. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले महान कार्य, समाजातील अंधश्रद्धा व अन्यायाविरुद्ध दिलेला संघर्ष यावर आपले मनोगत व्यक्त केले. त्यांच्या विचारांतून शिक्षणाचे महत्त्व, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक समता व आत्म सन्मानाचा संदेश आजच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नववी वर्गातील कु. प्रीती कांबळे व आर्चना सोनवणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गेवराई येथील कृषी प्रदर्शनात उद्या स्व.गणेशराव बेद्रे किसान कृषिरत्न पुरस्काराचे वितरण व समारोप

### मनोज जरांगे पाटील, विजयसिंह पंडित, अशोक पाटील यांची राहणार उपस्थिती

**गेवराई । प्रतिनिधी**

**येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अकरा शेतकऱ्यांसह शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर सहकार्य करणाऱ्यांना प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी पुरस्कार दिले जातात. या पुरस्कार वितरण व समारोप सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक महेश बेदरे व स्वागताध्यक्ष बप्पासाहेब तळेकर , पुरस्कार समिती प्रमुख राजेंद्र आतकरे, कार्याध्यक्ष अजय दाभाडे यांनी केले आहे.**





गेवराई येथे किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात उद्या दि. ५ जानेवारी रोजी किसान कृषिरत्न पुरस्कार वितरण व प्रदर्शनाचा समारोप सोहळा दुपारी १२:३० वा. संपन्न होणार आहे. दरम्यान या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मराठा आंदोलन संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, माजी मंत्री अशोक पाटील, गेवराई चे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित, औरंगाबाद विभागाचे कृषी उपसंचालक वानखडे साहेब, बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, सरचिटणीस आदित्य दादा पाटील या मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कारासाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांना कृषिरत्न पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे. तरी या पुरस्कार वितरण सोहळ्यास व समारोप कार्यक्रमास शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक महेश बेदरे पुरस्कार वितरण समिती प्रमुख राजेंद्र आतकरे यांनी केले आहे.

## लोकनेते सोळंके साखर कारखान्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

**भारतात स्त्रीयांसाठी शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या समाजसेविका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती लोकनेते सुंदरराव सोळंके साखर कारखान्यात दि ०३ जानेवारी शनिवार रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.**



भारतातील स्त्रीयांना शिक्षण मिळावे,त्या सुशिक्षित होऊन स्वकर्तृत्वावर जीवन जगाव्यात यासाठी मोठे योगदान देणाऱ्या स्त्री शिक्षणाच्या जननी ,क्रातीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तेलगाव येथील लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्यात कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना कार्यालयात कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमात सचिव सुरेश लगड यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी भारतराव शेळके, रामदास आगे,बळीराम निपटे,नानाभाऊ वाघचौरे,विठ्ठल पौळ,ज्ञानेश्वर ठोंबरे आदिसह कारखाना कर्मचारी कामगार उपस्थित होते.

## महिलांना शिक्षण देण्याचं धाडस!

### सावित्रीबाई फुलेंनी दाखवले-सखाराम वनवे

वडवणी । प्रतिनिधी

भारतातील स्त्री शिक्षणाचा ज्यांनी पाया रचला आणि स्त्रियांसाठी शिक्षणाची बंद असलेली दारे उघडली अशा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले.यांच्या जयंतीचे आयोजन ३ जानेवारी २०२६ रोजी शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण ता.धारूर जि.बीड या शाळेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री.सखाराम वनवे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केले गेले होते. या कार्यक्रमाप्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्य-कर्तुत्वाचा,शिक्षण रूपी जे महान कार्य केले याचा.आपल्या भाषणातून पूजा साबळे श्यामबाला वाकतकर दुर्गा सोनुळे रेखा अंभोरे पूनम पांढरे अशा अनेक विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांचे कार्याविषयी आपले मनोगत व्यक्त केले, तसेच फुले सावित्री नसती तर,मुलगी शिकली असती का? आम्ही सावित्रीच्या लेकी अशा अनेक गीतातून कृतीयुक्त विद्यार्थ्यांनी सहभागी होवून, त्यांनी केलेल्या कार्याचा तसेच नाटकाच्या माध्यमातून शिक्षणा अभावी अडाणी असलेल्या माणसाला आलेले एक पत्र वाचून घेण्यासाठी एका व्यक्तीने त्याच्याकडून ,फोडून घेतलेली लाकडे आणि नंतरच त्याला ते पत्र वाचून दाखवलं. अशा या नाटकाच्या माध्यमातून शिक्षणाभावी माणसाची काय परिस्थिती होते.याचं प्रत्यक्ष नाटकांमधून शाळेतील बाल कलाकारांनी शिक्षणाचा महत्त्वाचा संदेश यामधून दिला.अशा विविध माध्यमातून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला उजाळा शाळेतील विद्यार्थ्यांनी दिला.सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांना सहभागी विद्यार्थ्यांना अनेक विद्यार्थ्यांना नगदी स्वरूपातील धनादेशचे बक्षीस शालेय शैक्षणिक पॅड साहित्याचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## गजानन विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

**येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रशांत पवळ हे होते.**



यावेळी प्रथम जयंती निमित्त क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना प्राचार्य पवळ म्हणाले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी राज्यातील महिला सक्षमीकरणासाठी तर माजी खा.स्व.केशरकाकू क्षीरसागर यांनी जिल्ह्यातील मुली उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर कशा उभा राहतील हा दुरदृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक विद्यार्थीनींनी आपली शैक्षणिक प्रगती केली पाहिजे असे सांगितले. याप्रसंगी उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस., पर्यवेक्षक दगडे व्ही. एन., सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ऋतुजा राहिंज हिने केले तर हर्षदा कस्पटे हिने उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने झाली.

## पान १ वरून...

### महासांगवीच्या केळीची इराणला

कोंबडी खत आणि शेणखताचा समतोल वापर केल्यामुळे उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. महासांगवीसारख्या ग्रामीण भागातून केळीची निर्यात होणे, ही केवळ पाटोदा तालुक्यासाठीच नाही तर संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या प्रयोगामुळे इतर शेतकऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण असून, हा यशस्वी प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

----------

### राज्यात प्रचाराची रणधुमाळी;

मनसे अशी लढत आहे. त्याचवेळी नवी मुंबईत भाजपाला एकनाथ शिंदे यांची शिवसेना भिडणार आहे. मीरा भाईंदरमध्येही भाजपा विरुद्ध शिंदे सेना आणि काँग्रेस अशी लढत आहे. वसई विरार महापालिकेत भाजपा - शिवसेना युती माजी आमदार जितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीशी मुकाबला करणार आहे. तर पनवेल महापालिकेत भाजपा विरुद्ध शेकाप अशी लढत आहे. पुणे आणि पिंपरी - चिंचवडमध्ये अजित पवार आणि शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र आली आहे. त्यांचा सामना भाजपाशी आहे. सांगली मिरज कुपवाड महापालिकेत भाजपा विरुद्ध काँग्रेस असा सामना आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड महापालिकेत भाजपा - शिवसेना युती तुटली आहे. त्यामुळे सत्तेतील दोन पक्ष येथे एकामेकांच्या विरोधात लढणार आहेत. त्याचवेळी परभणीत ते एकत्र आले आहेत. विदर्भात नागपूरमध्ये भाजपाने शिंदेंना सोबत घेतले असताना अमरावतीमध्ये मात्र युती तुटली आहे. नाशिकमध्ये भाजपा विरुद्ध शिवसेना - राष्ट्रवादी युती असा सामना रंगणार आहे. त्याचवेळी उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि मनसे कशी कामगिरी करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकंदरच महापालिकांच्या निवडणुकीत बहुरंगी लढती लढल्या जाणार आहेत.

------------

### शरद पवारांसह महाराष्ट्रातील

एकाच दिवशी राज्यसभेतून निवृत्त होणार आहेत. ७१ खासदारांमध्ये मार्च महिन्यात १, एप्रिलमध्ये ३७, जूनमध्ये २२ तर नोव्हेंबरमध्ये ११ खासदार निवृत्त होणार आहेत. भाजपचे सर्वाधिक ३० खासदार यंदा राज्यसभेतून निवृत्त होत आहेत. निवृत्त होणाऱ्या खासदारांमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा देखील समावेश आहे. याशिवाय झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन, गुजरातमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शक्तीसिंह गोहिल, तेलंगणातील काँग्रेस नेते अभिषेक मनू सिंघवी, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह, तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले, लोकसभेचे माजी उपसभापती थंबी दुराई आणि द्रमुक नेते तिरुची शिवा हेही राज्यसभेच्या निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत.

-------------

### सह्याद्री वनराईला

बसला पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. याबाबत आपण जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचेही सयाजी शिंदे यांनी म्हटले. दरम्यान, शुक्रवारी पुन्हा एकदा देवराई प्रकल्प परिसरात आग लागल्याची घटना घडल्यानंतर वनविभागासह सयाजी शिंदे यांच्या बीडमधील शिष्टमंडाने देवराई प्रकल्पाची पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन घडलेला संपूर्ण प्रकार त्यांना सांगण्यात आला. या आगीने क्षणात रौद्ररूप धारण केले. झाडं, औषधी वनस्पतींची नासधूस आणि पक्षांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. ७ वर्षांपासून तेथे त्यांच्या माध्यमातून वनराई फुलवण्यात आली आहे. मात्र, समाजकंटकांना हे बघवत नसून त्यांनी ही झाडं जाळून टाकल्याने वृक्षप्रेमींकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे, असे शिंदे म्हणाले.

-------------

### मराठी दशावतार'

करणाऱ्या एका निष्ठावंत कलाकाराचा अवतार म्हणजेच 'दशावतार' यानिमित्ताने प्रेक्षकांना पाहायला मिळाला. याशिवाय दिलीप प्रभावळकर यांनी साकारलेल्या बाबुली मिस्त्रीच्या भूमिकेचे सुद्धा सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आले होते. मुख्य स्पर्धेच्या कॅटेगिरीत निवडला गेलेला 'दशावतार' हा बहुदा पहिलाच मराठी चित्रपट आहे. हजारो चित्रपटातून जे १५०+ चित्रपट निवडले गेलेत त्यातला हा एकमेव मराठी चित्रपट आहे. आणि अकॅडमीक स्क्रीनिंग रूम मध्ये तो दाखवला जाणारा पहिलाच मराठी चित्रपट आहे. दिग्दर्शक सुबोध खानोलकर यांनी पोस्ट करत म्हटले आहे की, कष्टांचं, प्रामाणिकपणाचं, मोठं स्वप्नं पाहण्याचं चीज होतंच फक्त कामावर विश्वास हवा, खाली मान घालून कष्ट करत राहण्याची चिकाटी हवी, पडल्यावर पुन्हा उभं राहण्याची जिद्द हवी आणि विश्वास ठेवणाऱ्या माणसांची खंबीर साथ हवी. 'दशावतार' ऑस्करच्या म्हणजेच अकॅडमी अवॉर्ड्सच्या मुख्य स्पर्धेत निवडला गेल्याचा मेल आला आणि गेली अनेक वर्षे आम्ही सगळ्यांनी जी मेहनत घेतली त्याची दखल घेतली गेल्याचं समाधान मिळालं. हे समाधान फक्त 'दशावतार' निवडला गेलाय म्हणून नाहीये, तर आपला मराठी चित्रपट जागतिक स्तरावर तोडीस तोड उभा राहू शकतो हे पुन्हा एकदा सिद्ध होतंय म्हणून आहे. दरम्यान, 'दशावतार' या चित्रपटाच्या माध्यमातून लेखक व दिग्दर्शक सुबोध खानोलकर यांनी कोकणात खदखदत असलेल्या महत्त्वाच्या मुद्द्याला हात घातला होता. ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्यासह महेश मांजरेकर, भरत जाधव, सिद्धार्थ मेनन, अभिनय बेर्डे, प्रियदर्शिनी इंदलकर, विजय केंकरे, सुनील तावडे, रवी काळे, आरती वडगबाळकर या कलाकारांच्या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.

---------

### जनतेचे आशीर्वाद व प्रेम आहे तोपर्यंत कुणी

शिवशला माई नागरगोजे यांच्या पुण्यस्मरण सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित विविध सामाजिक उपक्रम व शैक्षणिक स्पर्धांच्या समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या निमित्ताने धनंजय मुंडे बोलत होते. धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले, या भागाचा लोकप्रतिनिधी म्हणून या भागातील विकास कामांना गती देण्याचे काम मी केले व करतो आहे. मागील वर्षी मी कृषिमंत्री असताना अनेकांचा विरोध पत्करून धर्मापुरी येथे सोयाबीन संशोधन व प्रक्रिया केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अधिक उत्पादन क्षमतेचे बियाणे तयार करण्यापासून ते सोयाबीन वरती प्रक्रिया करून विविध उत्पादनांना अधिकाधिक भाव मिळवून देण्यापर्यंत असा शेतकऱ्यांचा बहुअर्थाने फायदा होणार असून त्यांच्या उत्पन्नात वृद्धी सुद्धा होणार आहे. त्यामुळे या सोयाबीन संशोधन केंद्राच्या उभारणीसाठी पूर्वी मंजूर केलेल्या निधीमध्ये आणखी वाढ करून वाढीव प्रशासकीय मान्यता लवकरच प्रदान करण्यात येईल व त्यानंतर याच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात होईल असेही प्रतिपादन यावेळी धनंजय मुंडे यांनी केले. यावेळी त्यांनी विरोधकांचा आपल्या शैलीमध्ये समाचार घेतला. ते म्हणाले की, या भागातील जनतेचे प्रचंड प्रेम व आशीर्वाद जोपर्यंत माझ्या पाठीशी आहेत तोपर्यंत माझे कुणी काही बिघडवू शकत नाही. मुंडे यांच्यावर सातत्याने अनेकांकडून टीका केली जात आहे मात्र माझा मतदारसंघ माझ्या पाठीशी असल्याचे धनंजय मुंडे यांनी वेळोवेळी जाहीरपणे सांगितले आहे. याशिवाय नुकत्याची झालेल्या नगरपरिषदेच्या निवडणुकीतही धनंजय मुंडे यांना जनतेने मोठे यश दिले आहे. यामुळे त्यांनी व्यक्त केलेला विश्वास महत्वाचा ठरतो. दरम्यान धर्मापुरी येथील कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित असलेले बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र व सिने अभिनेता संदीप पाठक यांनी धनंजय मुंडे यांच्या मैत्री व राजकीय कारकीर्दीवर प्रकाश टाकला. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यापासून समाजकारण व राजकारणाचे बाळकडू घेतलेले धनंजय मुंडे हे लोकसेवेतून लोकप्रिय झालेले आहेत त्यामुळे ते मोठे नेते असून, देवाक काळजी रे, या गाण्यातील ओळींप्रमाणे मागे काय झाले ते विसरून आता पुढे आणखी चांगले काय होणार आहे याकडे लक्ष केंद्रित रहावे असे गौरवोद्गार संदीप पाठक यांनी काढले. यावेळी संदीप पाठक यांनी त्यांच्या जगप्रसिद्ध असलेल्या वऱ्हाड निघाले लंडनला या नाटकाची झलकही स्वतः अभिनय करून दाखवली. यावेळी व्यासपीठावर धर्मापुरीचे सरपंच ॲड गोविंदराव फड, कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्करराव नागरगोजे, संस्थेचे सचिव विजयकुमार नागरगोजे, डॉ. सरस्वतीताई नागरगोजे, प्राचार्य गित्ते यांच्यासह परिसरातील पदाधिकारी स्थानिक नागरिक व संस्थेच्या विविध विद्यालयांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

### भारतात महिला कैद्यांची

भारताची लोकसंख्या ३० टक्क्यांनी वाढली त्यात पुरुष कैद्याची संख्या लक्षणीय वाढल्याचे दिसत आहे. महिला कैद्यांची संख्या म्हणजे सर्वच गुन्हेगार आहेत असे नाही, यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये शिक्षा भोगत असलेल्या महिलांची संख्या आहे मग ते कौटुंबिक प्रॉपर्टी हिंसात्मक आणि इजा पोहोचवणारे गुन्हे आहेत.

-------------

cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ०४ जानेवारी २०२६





## चिंचाळा जि.प.के.प्रा.शाळेत माजी विद्यार्थी पालक मेळावा संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथे शाळेच्या वतीने माजी विद्यार्थी आणि पालक मेळाव्याचे आयोजन शनिवारी २७ डिसेंबर रोजी करण्यात आले होते या कार्यक्रमाला चिंचाळा जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळेत जे विद्यार्थी शिकले आणि घडले असे विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने कार्यक्रमांना बोलावण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष बळीराम आजबे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख देशमुख सर हे होते. यावेळी शेळेचे माजी विद्यार्थी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले विद्यार्थ्यांनी सादर स्वागत गीत सादर केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला माजी विद्यार्थी तसेच काही पालकांनीही शाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला शाळेचे विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते.या कार्यक्रमाला बळीराम अजबे, श्रीराम खटावकर, सोमनाथ खताळ,देशमुख सर,गांडगे सर,सुभाष अजबे, लक्ष्मण मुंडे,ॲड मॅचिंद डोगरदिवे,ॲड मुकुंद जोशी,सुशांत काळे,विनायक राऊत,आसाराम खटावकर,बाबासाहेब डावरे संदीप खटावकर, बकट काळे,विक्रम कोळपे अश्विनकुमार डावरेसर,सय्यद मोबिन,विष्णुपंत नेमाटे,सचिन अजबे,माऊली अजबे,,गणेश कोळपे,दत्ता आवाड, आसेफ सय्यद, लक्ष्मण शिंगाडे,पप्पू अजबे,गोविंद शिंगाडे,राजेंद्र चाळक,सर्जेराव जाधव,नॅनोबा जाधव, त्रिंबक पायके,चव्हाण सर,शिंदे सर,भारत राठोड,आडे सर,लिगस्कर सर,हे उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप चाळक उपाध्यक्ष संदीप माने यांनी व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली होती.



## वाघोरा शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघोरा जिल्हा परिषद शाळेत दि.३ जानेवारी शनिवार रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती आनंदोत्सवात साजरी करण्यात आली. सदरील कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंची प्रतिमा पूजन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या रंजना भुम्बर ,नीता सटाले,रुक्मिण बादाडे, सुनिता कोरडे, संगीता बादाडे, आशाबी पठाण, नंदा नवगीरे व सावित्रीबाई फुले वेशभूषेतील विद्यार्थिनीनी प्रतिमापूजन केले. प्रमुख पाहुण्यांचे विद्यार्थिनी अंजली बादाडे, आरती नाईक नवरे, इरम शेख, अस्मिरा शेख,भक्ती डाके, लक्ष्मी नाईकनवरे यांनी स्वागत गीतातून व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्य, गीत गायन सादर केली. सावित्रीबाई वर आधारित स्वरचित गीत गणेश झाटेसरांनी सादर केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन संजय राठोड, माधव गड्डापोड यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली बादाडे व लक्ष्मी नाईकनवरे, आकर्षक सुंदर फलक लेखन व छायाचित्रण केशव बादाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विठ्ठल वाघ,बबन कपाटे, निदेशक केशव बादाडे शेवटी सर्व उपस्थित यांचे आभार प्रभारी मुख्याध्यापक एन .आर .राठोड सरांनी मानले. कार्यक्रमासाठी माता-पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठी पत्रकार परिषदेचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष गजानन नाईक यांना मातृशोक

सावंतवाडी । प्रतिनिधी



मराठी पत्रकार परिषदेचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष गजानन नाईक यांच्या मातोश्री श्रीमती जयश्री राजाराम नाईक वय ९४ वर्ष ( मूळ रा..रतनागिरी) यांचे वृध्दापकाळामुळे आज सकाळी दुःखद निधन झाले.त्यांच्यावर रत्नागिरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या पश्चात चार मुलगे, एक मुलगी सुना जावई नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार आहे ज्येष्ठ पत्रकार गजानन नाईक, निवृत्त बँक अधिकारी प्रकाश नाईक, निवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी प्रदीप नाईक निवृत्ती एसटी कर्मचारी प्रमोद नाईक यांच्या त्या मातोश्री होत.

## विद्युत कर्मचारी स.पतसंस्थेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

३ जानेवारी २०२६ विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. पाटोदा यांच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या प्रसंगी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक व क्रांतिकारी कार्याची माहिती देऊन करण्यात आली. स्त्री शिक्षणाचा पाया मजबूत करत समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व अन्यायाविरुद्ध त्यांनी दिलेला लढा आजही प्रेरणादायी आहे, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास सुनील वाघमारे, सतीश गोरे,वैभव नाईकनवरे, खंडू बोबडे, चौरे,नाईकवाडे,शेख तसेच आझाद पत्रकार गणेश शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, सभासद व मोठ्या संख्येने उपस्थित होते.जयंती निमित्त सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा, तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी व्यक्त केला. कार्यक्रम शेवटी उपस्थितांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला सलाम करत सामाजिक समतेसाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार केला.

# अल्पवयीन मुलांच्या हातात गाडी, पालकांच्या हातात बेडी!

## बीड पोलीस अधीक्षकांचा कडक इशारा

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शाळा आणि कोचिंग क्लासेसला जाणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या हातात पालकांनी वाहने दिल्यास आता थेट पालकांवरच गुन्हे दाखल होणार आहेत. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी या संदर्भात कडक आदेश जारी केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पालकांना ३ वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा भोगावी लागू शकते. वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी आणि अल्पवयीन मुलांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी १८ वर्षांखालील मुले परवाना नसतानाही दुचाकी किंवा चारचाकी वाहने चालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा प्रकरणांमध्ये केवळ मुलांवरच नाही, तर त्यांच्या पालकांवर



'भारतीय न्याय संहिता', 'मोटर वाहन कायदा' आणि 'जेजे क्ट'च्या विविध कलमान्वये कारवाई केली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने २५ हजार रुपयांचा दंड आणि ३ वर्षांपर्यंतच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

या कारवाईचे परिणाम केवळ दंडापर्यंत मर्यादित नसून, संबंधित मुलांच्या भविष्यावरही याचा मोठा परिणाम होणार आहे. जर एखाद्या अल्पवयीन मुलावर वाहतूक नियमांच्या उल्लंघनाचा गुन्हा दाखल झाला, तर त्याला वयाच्या २५ वर्षांपर्यंत वाहन परवाना मिळणार नाही. तसेच भविष्यात नोकरी, पासपोर्ट किंवा चारित्र्य प्रमाणपत्र मिळवताना अडचणी निर्माण होऊ शकतात. अपघाताच्या स्थितीत विम्याचा दावाही फेटाळला जाणार असल्याने पालकांनी गंभीर दखल घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षकांनी शाळा आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांचे समुपदेशन करावे आणि हा संदेश पालकांच्या व्हॉट्सप ग्रुपवर पोहोचवावा. अल्पवयीन मुलांसाठी सायकल किंवा ई-सायकल हा सुरक्षित पर्याय असल्याचेही पोलिसांनी सुचवले आहे.

## सावित्रीबाईंनी स्त्रियांच्या जीवनात शिक्षणरूपी सुगंध पसरविला-डॉ. प्रतिभा अहिरे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आद्य स्त्रि-शिक्षणाचा प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने डॉ. व्यंकटेश अविनाश सोळंके यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी महाविद्यालयातील दहा गरीब व होतकरू मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या वतीने त्यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात आले. महाविद्यालयातील इतिहास विभाग, सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. प्रतिभा अहिरे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व्यक्तिमत्व आणि कार्य या विषयावर विचार व्यक्त करताना सांगितले की, शिक्षण हे गुलामी नष्ट करण्याचे हत्यार आहे हे ओळखून सर्वच स्तरांतील स्त्रियांच्या जीवनात



शिक्षणरूपी सुगंध पसरविण्याचे महान कार्य सावित्रीबाईंनी केले असे सांगितले. जन्मापासून मृत्यूपर्यंत स्त्री कधीही स्वतंत्र नसते. लहानपणापासूनच तिला स्त्री म्हणून घडविले जाते, तसे तिला संस्कारीत केले जाते. समाजातील सर्वाधिक शोषण महिलांचे होते. महात्मा फुले यांनी शोषणाचे मूळ ओळखून प्रथमता स्त्रियांना शिक्षित केले पाहिजे यासाठी यासाठी महिलांना शिक्षण देण्यासाठी सावित्रीबाईंना शिक्षित केले व भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. समाजव्यवस्थेतील सर्व घटकांतील स्त्रीयांच्या उद्धाराचे कार्य महात्मा फुले व सावित्रीबाईंनी केले. तसेच समाजातील विधवापुनर्विवाह, केशवपण, सतीप्रथा, अंधश्रध्दा यांसारख्या प्रथाना विरोध केला असे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी सांगितले की, तत्कालीत समाजव्यवस्थेला शरण न जाता सावित्रीबाई शिक्षण घेतात. स्त्रियांना शिकविणाऱ्या पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आहेत. त्यांच्या कठोर परिश्रमामुळेच मुली आवडीनुसार शिक्षण घेऊन हव्या त्या क्षेत्रात नोकरी करताना दिसत आहेत असे सांगितले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. विनायक कापावार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बाळासाहेब जोगदंड, यांबरोबरच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. राहुल साळवे यांनी तर आभार प्रा. नागोराव वाघामारे यांनी केले.

पान ६ वरुन...

### भाजपचे युवा नेते

क्षीरसागर यांनी व्यक्त केली. गहिनीनाथ गडावरील भक्तिमय वातावरण मन प्रसन्न करणारे असून नवउर्जा देणारे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी असंख्य भाविक भक्त उपस्थित होते. या सप्ताह कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक गहिनीनाथ गडावर उपस्थित राहणार असून कीर्तन, प्रवचन, हरिपाठ आणि विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. संत वामनभाऊ महाराजांच्या विचारांचा जागर करत हा ज्ञानयज्ञ सोहळा भक्तांसाठी आध्यात्मिक प्रेरणास्थान ठरणार आहे.

### सावित्रीच्या लेकींची

अथक प्रयत्नामुळे आजची स्त्री ही शिक्षण घेऊन सर्व क्षेत्रात आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा उमटवीत आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा प्रवीण फुटके यांनी केले . तर प्रा डॉ विवेकानंद कवडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यानंतर महाविद्यालयातील सावित्रीच्या लेकी सर्व महिला प्राध्यापिका व विद्यार्थिनींना मानाचा फेटा बांधण्यात आला. व दुचाकी रॅली काढण्यात आली. ही रॅली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन, धनंजय ढोणे, डॉ शालिनी कराड यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरूवात करण्यात आली. ही रॅली आझाद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर स्टेशन रस्ता, राणी लक्ष्मीबाई टाँवर चौक ते महिला महाविद्यालयात संपन्न झाली. या बाईक रॅली यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या भव्य बाईल रॅलीने परळीतील सर्व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

### विकासाला गती देण्याचा

व नगरसेवकांनी आपला पदभार घेतला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला नगराध्यक्षा म्हणून एक महिला नगराध्यक्ष पदावर विराजमान झाली हा एक सुवर्णक्षण यावेळी बघायला मिळाला.

संविधान प्रास्ताविकेचे अनावरण

याप्रसंगी नगरपरिषद कार्यालय इमारतीमध्ये प्रवेशद्वारात दर्शनी भागावर संविधान प्रस्ताविकेची भव्य व आकर्षक कोनशीला तयार करुन बसवण्यात आली आहे. आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते व नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी व नगरसेवकांच्या उपस्थितीत या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.

नगरसेवकांना कर्तव्यपुस्तिकेचे वितरण

दरम्यान महाराष्ट्रात प्रथमच परळी नगरपरिषदेने सर्व नगरसेवकांसाठी मार्गदर्शक ठरेल, त्याचबरोबर नगरसेवकांचे अधिकार, कर्तव्ये, कायदेशीर माहिती, कामकाजाची माहिती, प्रशासकीय माहिती अशी संपूर्ण संकलित माहिती असलेली एक कर्तव्य पुस्तिका प्रकाशित केली आहे. या कर्तव्यपुस्तिकेचे विमोचन आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर नवनिर्वाचित नगराध्यक्षा व सर्व नगरसेवकांना या कर्तव्यपुस्तिकेचे वितरण करण्यात आले.

या समारंभाला नगराध्यक्ष सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह प्रभाग क्रमांक एक चे नगरसेवक आघाव वंदना अश्विनकुमार, मुंडे दीपक प्रल्हादराव, प्रभाग क्रमांक दोन चे नगरसेवक इंगळे कविता अनंत, अल्ताफ खान सरदार खान पठाण, प्रभाग क्रमांक तीन चे नगरसेवक सय्यद फारुख गणी, शेख आयेशा मोहसीन, प्रभाग क्रमांक चार चे नगरसेवक नितीन नामदेव रोडे, मीरा केशव नागरगोजे, प्रभाग क्रमांक पाचचे नगरसेवक सौ. जयश्री शंकरआप्पा मोगरकर, सोळंके वैजनाथ भानुदास, प्रभाग क्रमांक सहा चे नगरसेवक बनसोडे अंजली केशवराव, शिंदे व्यंकटेश बाबुराव, प्रभाग क्रमांक सात चे नगरसेवक केंद्रे अश्विनी राहुल, सारडा सचिन रामनाथ, प्रभाग क्रमांक आठ चे नगरसेवक रोडे अर्चना महेंद्र, इस्माईल मौला शेख ,प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक कांबळे सुनील भाऊसाहेब, पठाण खैसर राजा खान, प्रभाग क्रमांक दहाचे नगरसेवक डावरे सरोजा गौतम, मुरकुटे लक्ष्मण जनार्दन, चाटे कुसुम अण्णासाहेब, प्रभाग क्रमांक ११ चे नगरसेवक रोडे महादेव नागनाथ, गीते जयश्री रवींद्र, प्रभाग क्रमांक १२मधील नगरसेवक कराड प्राजक्ता श्रीकृष्ण, मेनकुदळे योगेश विजयकुमार, प्रभाग क्रमांक १३ चे नगरसेवक बळवंत रेशमा केशव, लाहोटी शिल्पा जयपाल, प्रभाग क्रमांक १४ चे नगरसेवक मुंडे पवनकुमार महादेव, डॉ. पूजा प्रितेश तोतला, प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक देशमुख प्रतीक्षा रणजीत, सय्यद फर्जाना बेगम सय्यद सादिक, प्रभाग क्रमांक १६ चे नगरसेवक कुरेशी आरेफाबेगम महबूब पाशा, बागवाले नितीन माणिक, प्रभाग क्रमांक १७ चे नगरसेवक पवार रूपाली रमेश, शेख अब्दुल रहमान हाजी बाबू अब्दुल रशीद यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पै.सतीश शिंदे यांच्या

दिवस आबाकडे येते!

सर्वसामान्य जनतेच्या हक्काचे कार्यक्रम कामे ३६४ दिवस आबा करतात सातत्याने जनतेमध्ये मिसळून राहतात आणि त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतात. जनते प्रति असलेलं सतीश आबा शिंदे यांचं प्रेम आणि नातं हे अस्थी पाटोदा शिरूर मतदार संघातील जनतेने पाहिलं आहे म्हणून तर जनता त्यांच्या वाढदिवसानिमित्त हजारोंच्या संख्येने शुभेच्छा देण्यासाठी आबांकडे एक दिवस येत असते हाच तो क्षण जो आबांसाठी सर्व जनता हक्काने राखून ठेवलेला असतो... हक्काच्या आबांसाठी हक्काची जनता जमते आष्टी मध्ये... आम्ही येतोय तुम्हीही या अशा पद्धतीने आव्हान केलं जात आहे.

### गणपत खेडकर यांचा

सुरेशलाल जाजु, शेख, अमर टेलर बाबा, ड. पवन लाहोटी, भाई पठाण, ग्रामपंचायत सदस्य अजिनाथ खेडकर, राजू नागरे, भारत मडके, भारत घाडगे, ड. योगेश खेडकर यांच्यासह मित्रपरिवार, नातेवाईकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सामाजिक व राजकीय क्षेत्रातही योगदान

गणपत खेडकर यांनी चकलांबा आणि परिसरातही सामाजिक क्षेत्रात मोठे काम केले आहे. अनेकांच्या समस्या सोडवल्या आहेत. गावातील आणि परिसरातील बांधण्यात समन्वय साधून भांडण, तंटा मिटविणे. समाजकारणासह गावातील त्यांनी विधायक कामे केली.

## वर्धमान महावीर इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

कडा । प्रतिनिधी

वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर इंग्लिश स्कूल कडा या सीबीएसई बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा उडाण -२०२५ हा १४ वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला




प्रमुख पाहुणे म्हणून सीबीएसई बोर्ड सीओई पुणे येथील सेक्शन ऑफीसर श्रीमती पल्लवी माळी मॅडम आणि आष्टी येथे कर्तव्यदक्ष नायब तहसीलदार श्री भागीरथ धारक साहेब तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणुन एसबीआय बँकेचे मॅनेजर श्री प्रशांत झाडे साहेब उपस्थित होते.त्याचबरोबर संस्थेचे अध्यक्ष- श्री अमित राठोड उपाध्यक्ष- श्री संदिप चांनोदिया, सचिव -हेमंत मेहेर, कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोद भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री मनीष गांधी, श्री प्रकाश श्रीश्रीमाळ, श्री अमोल पटवा ,श्री संजय पितळे श्री संतोष गांधी, सल्लागार पी. जी.मेहेर मुख्याध्यापक - अभिलाष के. के., उपमुख्याध्यापिका- श्रीमती.अफशान शेख इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

महिला सशक्तीकरण या संकल्पनेवर आधारित महिलांना रूढीवादी विचार आणि भेदभावापासून मुक्त करून त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेत समान हक्क आणि संधी देऊन त्यांना सक्षम बनवणे यावर आधारित नाटिका आणि अप्रतिम असे नृत्याविष्कार चिमुकल्यांनी सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमाला कडा आणि कडा परिसरातील पालकवर्ग आणि विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

## ईगलवुड इंग्लिश स्कूलने पटकावला सलग चौथ्यांदा प्रथम क्रमांक

माजलगाव । प्रतिनिधी

तालुकास्तरीय ५३ व्या विज्ञान प्रदर्शनात ईगलवुड इंग्लिश स्कूलने सलग चौथ्यांदा प्रथम क्रमांक पटकावून शैक्षणिक क्षेत्रात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. विशेष म्हणजे इयत्ता ९ ते १२ गटातून तालुक्यात प्रथम येण्याचा मान शाळेला मिळाला आहे.



या प्रदर्शनात इयत्ता ९ वीचे विद्यार्थी स्वराज हरिभाऊ जाधव आणि पृथ्वीराज दिनकर शेजूळ यांनी सहभाग नोंदवला. त्यांनी सादर केलेल्या प्रयोगाचे नाव हरित ऊर्जेद्वारे कचरा व्यवस्थापन असे असून, पर्यावरणपूरक आणि भविष्यासाठी उपयुक्त अशा संकल्पनेमुळे परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

हे ५३वे विज्ञान प्रदर्शन फ्लाइंग बर्ड अकॅडमी या शाळेत भरवण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार मॅडम, सचिव डॉ.शरद पवार सर, विश्वस्त डॉ.सुशील लोढा सर, शाळेचे प्राचार्य सत्यजित कांजाळकर सर, उपप्राचार्या प्रणिता कांजाळकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले. या सातत्यपूर्ण यशाचे गमक म्हणजे डॉ.अर्चना पवार मॅडम यांचे शाळेवर असलेले वैयक्तिक लक्ष, नेहमीच दिली जाणारी प्रेरणा व मार्गदर्शन आणि त्यातून शिक्षकांन मध्ये आपल्या कामाप्रति तयार झालेली निष्ठा हेच आहे. या यशामागे अक्षय सर आणि कैलास सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनाची आवड आणि आत्मविश्वास निर्माण झाला असल्याचे व्यवस्थापनाने नमूद केले.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळा, पाटोदा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व आनंदनगरी मोठ्या उत्साहात साजरी

पाटोदा । प्रतिनिधी

प्रियदर्शनी प्राथमिक शाळा या संस्थेचे सचिव डॉ .योगेश भैय्या क्षीरसागर व डॉ सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक मोरे सरांच्या नियोजनातून, पाटोदा येथे थोर समाजसुधारिका व स्त्रीशिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंतीनिमित्त बाल मेळावा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारा आनंदनगरी उपक्रम आज दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी (शनिवार) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी केंद्र प्रमुख श्री . ढेरे सर पाटोदा नगरपंचायत नगराध्यक्ष राजू भैया जाधव सभापती किशोर आडागळे नगरसेवक संतोष दादा जाधव माजी नगरसेवक संदीप दादा जाधव पत्रकार सचिन



गायकवाड सर सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री एल आर जाधव सर श्रीधर स्वामी सानप प्राचार्य तांदळे सर प्राचार्य अविळे सर मुख्याध्यापक बोखारे सर मुख्याध्यापक खोले सर मुख्याध्यापक पठाण सर मुख्याध्यापक भोपळे मॅडमतसेच या शाळेचे मुख्याध्यापक पवन मोरे सर आजिनाथ नागरगोजे योगेश टेकाळे गोकुळ जिरेकर श्रीकांत लांडगे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित मुलांनी भाषणे सादर करून स्त्रीशिक्षणाचे महत्त्व व समाजसुधारणेचा संदेश दिला. यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर आधारित घोषवाक्यांनी संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आदर व सामाजिक जाणीव निर्माण झाली.

यानिमित्ताने आयोजित आनंदनगरी उपक्रम हा विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरला. शाळेच्या आवारात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक स्टॉल उभारण्यात आले. विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांचे स्टॉल मोठ्या उत्साहाने मांडले. पालकांनीही या उपक्रमास भेट देत विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक केले. आनंदनगरी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, संघभावना, नियोजन, आर्थिक व्यवहाराची ओळख व आत्मविश्वास वाढण्यास मोलाची मदत झाली. शिक्षकांनी वेळोवेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली.कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेलार मॅडम यांनी केले या वेळी विर मॅडम गायके मॅडम तसेच शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले शेवटी आभार प्रदर्शन माताडे सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## भारत नागरगोजे यांना मातृशोक

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद आरोग्य विभागातील आरोग्य कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भारत नागरगोजे यांच्या मातोश्री मिनाबाई ज्ञानोबा नागरगोजे गावातील आणि परिसरातील सर्वांच्या आबी (वय ७५) यांचे वृध्दापकाळाने शनिवारी दि.३जानेवारी रोजी सकाळी १० वाजता निधन झाले.



त्यांच्यावर दुपारी ३ वाजता त्यांच्या राहत्या गावी शिरूर तालुक्यातील तागडगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

शिरूर तालुक्यातील तागडगाव येथील रहिवासी असलेले आरोग्य विभागातील कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भारत नागरगोजे यांच्या मातोश्री मिनाबाई ज्ञानोबा नागरगोजे यांचे शनिवार दिनांक ३ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्यावर त्यांच्या राहत्या गावी तागडगाव येथे दुपारी ३ वाजता अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व नातेवाईक, परिसरातील स्नेही, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी सुन,नातवंडे असा मोठा परिवार आहे. मिनाबाई नागरगोजे परिसरात सुपरीचित होत्या गावात आलेल्या प्रत्येकाला चहा आणि जेवण केल्याशिवाय त्या कधी जाऊ देत नव्हत्या. सावकाश जा आणि गेल्यानंतर फोन कर असे आवर्जून सांगायच्या. भारत नागरगोजे यांच्या परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.


cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि. ४ जानेवारी २०२६
४

# शक्तिपीठ महामार्ग रद्द करा; अन्यथा सामूहिक इच्छामरणाची परवानगी द्या-शेतकरी

**नांदेड । प्रतिनिधी**

**शक्तिपीठ महामार्गामुळे उद्ध्वस्त होणारी सुपीक बागायती जमीन वाचविण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांनी टोकाचा पवित्रा घेतला आहे. महामार्ग कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा, अन्यथा सामूहिक इच्छामरणाची परवानगी द्यावी, अशी मागणी तब्बल २०० शेतकऱ्यांनी आपल्या रक्ताने लिहिलेल्या निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. या आंदोलनाने राज्याचे लक्ष वेधले आहे. हे निवेदन नांदेड जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आले असून, त्यावर तब्बल २०० शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.**



नांदेड जिल्ह्यातील शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकरी गेल्या पावणेदोन वर्षांपासून या महामार्गाला तीव्र विरोध करीत आहेत. पूर्णा व अप्पर पेनगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सुपीक, बागायती आणि उत्पादनक्षम जमीन वाचविण्यासाठी हा लढा सुरू आहे. विशेषतः अर्धापूर तालुक्यातील केळी, हळद यांसारखी पिके थेट परदेशात निर्यात होतात. या समृद्ध कृषी पट्ट्यातून महामार्ग गेल्यास शेती उद्ध्वस्त होईल, शेतकरी उद्ध्वस्त होतील आणि स्थानिक रोजगारावरही गंभीर संकट येईल, अशी भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. महामार्गासाठी आरेखन व मोजणीच्या नावाखाली अनेक वेळा शासकीय पथके गावांमध्ये दाखल झाली. मात्र शेतकऱ्यांनी संघटितपणे या पथकांना विरोध करून परतवून लावले आहे. असे असतानाही शासन दमनकारी मार्गाने मोजणी करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी आंदोलनाची दिशा अधिक तीव्र करत थेट सामूहिक इच्छामरणाचा इशारा दिला आहे. दरम्यान, शासनाने नुकतेच विधानसभेत सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शक्तिपीठ महामार्गाचे आरेखन बदलण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. त्या ठिकाणी जवळच समांतर महामार्ग उपलब्ध असल्यामुळे आरेखन बदलण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले. याच न्यायाने नांदेड जिल्ह्यातही शक्तिपीठ महामार्गाचे आरेखन बदलावे, अशी कळकळीची मागणी बाधित शेतकऱ्यांनी केली आहे. त्यांच्या परिसरातून प्रस्तावित महामार्गाच्या अवघ्या ३ ते ८ किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ (नागपूररत्नागिरी) समांतरपणे अस्तित्वात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने वेळीच निर्णय घेतला नाही, तर शेतकऱ्यांसमोर सामूहिक इच्छामरणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरणार नाही, अशी भावना या निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर शक्तिपीठ महामार्ग विरोधी कृती समितीचे समन्वयक सुभाष मोरलवार, सतीश कुलकर्णी, गजानन तीमेवार, प्रमोद इंगोले, कचरू मुधळ यांच्यासह विठ्ठलराव गरुड, पराग अडकिने, प्रदीप गावंडे, ज्ञानोबा हाके, अनिल चव्हाण, बापूराव ढोरे, ईश्वर सवंडकर, दिलीप कराळे, धोंडीराम कल्याणकर, सतीश देसाई, बालाजी इंगोले, सुभाष कदम, तुकाराम खुर्दा मोजे, सोनाजी बुट्टे, माधव इंगोले, शंकर तिमेवार, सुरज मालेवार, आनंदराव नादरे, दिलीप भिसे यांच्यासह अनेक बाधित शेतकऱ्यांच्या सह्या आहेत. शासनाने या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी आता सर्व स्तरांतून होत आहे.

# राज्यातील ५६२ लाख टन उसाचे गाळप पूर्ण



**अहिल्यानगर/ प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्यात ऊस गाळप हंगामाने जोर पकडला असून साखर आयुक्तालया तर्फे देण्यात आलेल्या माहितीनुसार, राज्यातील ९७ सहकारी व ९८ खासगी अशा एकूण १९५ साखर कारखान्यांनी यंदाच्या गळीत हंगामात ३१ डिसेंबर २०२५ अखेर एकूण ५६२.१ लाख टन उसाचे गाळप केले असून ४९२ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. राज्याचा एकूण सरासरी साखर उतारा ८.७५ टक्के इतका आहे.**

१२२.६१ लाख टन उसाचे गाळप करून कोल्हापूर विभागाने १२६.५४ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. कोल्हापूर विभागाचा उतारा १०.३२ टक्के इतका आहे. विभागात २५ सहकारी आणि १२ खासगी असे ३७ कारखाने सुरु आहेत. ऊस गाळप आणि साखर उताऱ्यात कोल्हापूर विभाग राज्यात आघाडीवर आहे. पुणे विभागात १७ सहकारी आणि १३ खासगी असे एकूण ३० कारखाने सुरु आहेत. त्यांनी आतापर्यंत १३३.३९ लाख टन उसाचे गाळप करून १२०.३२ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. पुणे विभागाचा उतारा ९.०२ टक्के आहे. सोलापूर विभाग ऊस गाळपात तिसऱ्या क्रमांकावर आहे. जिल्ह्यात १६ सहकारी आणि २९ खाजगी असे एकूण ४५ कारखाने सुरु आहेत. आतापर्यंत विभागात १२२.८२ लाख टन उसाचे गाळप पूर्ण झाले असून ९६.४ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन करण्यात आले आहे. विभागाचा उतारा ७.८५ टक्के इतका आहे. अहिल्यानगर विभागातील १५ सहकारी आणि ११ खासगी असे एकूण २६ कारखाने सुरु झाले आहेत. या विभागातील नगर-नाशिक जिल्ह्यातील सर्व कारखान्यांनी ६७.१७ लाख टन उसाचे गाळप करून ५५.४५ लाख क्विंटल साखर उत्पादित केली असून सरासरी साखर उतारा ८.२६ टक्के आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात १३ सहकारी व ९ खासगी अशा २२ कारखान्यांनी ५३.१५ लाख टन उसाचे गाळप पूर्ण झाले असून ३९.३२ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन करण्यात आले आहे. विभागाचा उतारा ७.४ टक्के इतका आहे. नांदेड विभागात १० सहकारी व १९ खासगी अशा २९ कारखान्यांनी ५६.८ लाख टन उसाचे गाळप पूर्ण झाले असून ४८.६५ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन करण्यात आले आहे. विभागाचा उतारा ८.६७टक्के इतका आहे. अमरावती विभागातील १ सहकारी व ३ खासगी असे ४ कारखाने सुरु असून ५.९३ लाख टन उसाचे गाळप करून ५.१४ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे. या विभागाचा साखर उतारा ८.६७ टक्के आहे. नागपूर विभागात २ खासगी कारखान्यांनी ०.२५ लाख मे. टन उसाचे गालप करून ०.१८ लाख क्विंटल साखर उत्पादन केले आहे. सरसरी साखर उतारा ७.२ टक्के आहे. मागील वर्षी याच काळात ३६९.३९ लाख टन उसाचे गाळप होऊन ३१७.०२ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले होते. यावर्षी मागील हंगामाच्या तुलनेत या हंगामात मोठ्या प्रमाणात ऊस गाळप होत आहे.

## नवती केळी बागेची पाने पिवळी आणि पोगा करपण्याचे प्रमाण रोखा



कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटाचा सामना करणाऱ्या केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणीत यावर्षी थंडीने मोठी भर घातली आहे. तापमानाचा पारा १० अंश सेल्सिअसच्या खाली गेल्यामुळे नवती केळी पिकाला मोठा फटका बसला असून, पाने पिवळी पडणे आणि पोगा करपण्याचे प्रमाण वाढले आहे.

यावर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अनेक शेतकऱ्यांनी केळीची लागवड केली. प्रती एकर सुमारे १ लाख ३० हजार रुपयांपर्यंत खर्च करूनही, निसर्गाच्या लहरीपणामुळे केळीची झाडे वाळू लागली आहेत. पिकांच्या वाढीसाठी २५ अंशांपेक्षा जास्त तापमान आवश्यक असते, मात्र कडाक्याच्या थंडीमुळे झाडांची वाढ पूर्णपणे थांबली आहे. रासायनिक व सेंद्रिय खतांचा वापर आणि महागड्या फवारण्या करूनही बागा जोम धरत नसल्याने, हताश झालेले शेतकरी आता उभ्या बागा उपटून टाकण्याच्या मानसिकतेत आहेत.

### थंडीपासून संरक्षणासाठी कृषी विभागाचा सल्ला

रात्रीच्या वेळी बागेला पाणी द्यावे आणि सकाळी ओला कचरा जाळून बागेत धूर करावा, जेणेकरून तापमान संतुलित राहील. नायट्रोजनयुक्त खते टाळून झाडाला पोटॅशियम, जस्त आणि फेरस सल्फेट (१० ग्रॅम प्रति झाड) द्यावे. तसेच, २५० ते १००० ग्रॅम कडुलिंब पेंड वापरावी. मुळांना थंडीपासून वाचवण्यासाठी वाळलेले गवत किंवा काळ्या पॉलिथिनचे आच्छादन करावे. केळीच्या घडांना ६ टक्के छिद्र असलेल्या प्लास्टिक पिशव्यांनी झाकावे. बागेच्या कडेला शेवरी किंवा तुतीसारखी वारा रोधक झाडे लावावीत. केळी बागांचे नुकसान टाळण्यासाठी भडगाव तालुका कृषी अधिकारी दीपक ठाकूर यांनी शेतकऱ्यांना उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

# भेंडीवर फळ पोखरणाऱ्या अळीचे एकात्मिक नियंत्रण


भेंडी पिकावर शेंडे व फळ पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव वाढतांना दिसत आहे. या किडीमुळे पिकाचे ४० टक्केपर्यंत नुकसान होऊ शकते. शेतकरी बांधवांनी योग्य वेळी कीड नियंत्रणाच्या एकात्मिक पद्धतीचा अवलंब केल्यास हे नुकसान टाळता येणार आहे.

**फळ पोखरणाऱ्या अळीमुळे होणारे नुकसान:**

वर्षभर कार्यक्षम असणाऱ्या या किडीला जास्त आर्द्र व उष्ण तापमान पोषक ठरते. या किडीची अळी अंड्यातून बाहेर निघाल्यानंतर कोवळ्या शेंड्याना पोखरून आत जाते. प्रादुर्भावग्रस्त पोंगा मलूल होऊन खालच्या दिशेने लोंबतो व नंतर वाळतो. अळीने पोखरलेल्या कळ्या व फुले वाळून खाली पडतात. फळावर अळीने केलेले छिद्र आणि तिची विष्ठा दिसते, तर प्रादुर्भावग्रस्त फळे विकृत आकाराची होतात. फळांची वाढ होत नाही. अशी फळे विक्री योग्य राहत नाहीत.

**फळे पोखरणाऱ्या अळीचे एकात्मिक नियंत्रण:**

कीडग्रस्त फळे तोडून अळीसह नष्ट करावे. अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टरी लावावेत. तसेच एकरी १० पक्षी थांबे लावावेत. सुरूवातीच्या अवस्थेत रासायनिक कीटकनाशकाऐवजी ढालकिडा, क्रायसोपा, सिरफिड माशी, भक्षक ढेकूण या मित्र कीटकांमार्फत अळीचे नियंत्रण करावे. ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ॲझाडिरेक्टीन (३०० पीपीएम)



५ मिलि प्रति लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी

करावी. बिव्हेरिया बॅसियाना (१ टक्के डब्ल्यूपी) १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी केल्यास शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीचे प्रभावी व्यवस्थापन होईल. एचएएनपीव्ही (२५० एलई) या विषाणूजन्य कीटकनाशकाची ०.५ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणे सायंकाळी फवारणी करावी. रासायनिक कीटकनाशकाची फवारणी फक्त किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर खालीलप्रमाणे फवारणी करावी. शेंडा व फळ पोखरणाऱ्या अळीसाठी इमामेक्टीन बेन्झोएट (५ एसजी) ०.२७ ग्रॅम किंवा लॅबडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) ०.६ मिलि मिली प्रति लिटर पाणी फवारणी करावी.

# शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे आणि त्यावर उपाय!

**व्यवसायाचा विचार केला तर प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी शेळ्यांचे पालन केले जाते. परंतु शेळ्यापासून मिळणारे मांस उत्पादन हे शेळ्यांच्या वजनावर अवलंबून असते. परंतु बऱ्याचदा काही कारणांमुळे शेळ्यांचे वजन कमी होते किंवा वाढत नाही व त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांना फार मोठा आर्थिक फटका बसू शकतो. त्यामुळे शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे व उपाययोजना यांची माहिती घेऊन त्यावर उपाययोजना करण्याची गरज आहे.**



शेळ्यांचे वजन कमी होण्याचे कारणे: शेळ्यांमध्ये बऱ्याच प्रकारचे रोग उद्भवतात व त्यामुळे वजनावर विपरीत परिणाम होतो. दुसरे कारण म्हणजे जेव्हा कळपात शेळ्या राहतात तेव्हा चाऱ्यासाठी एकमेकांमध्ये स्पर्धा निर्माण होते, ही बाब देखील शेळ्यांच्या शरीराचे वजन कमी करण्यास कारणीभूत आहे. कळपामध्ये ज्या शेळ्या थोड्या दुर्बल किंवा विनम्र असतात अशा शेळ्यांचे वजन कमी होते. साहाजिकच कळपातील मजबूत आणि मोठ्या शेळ्या कमकुवत शेळ्यांच्या अन्न आणि जागेवर अधिकचा हक्क सांगतात व आहारात प्रवेश नाकारला जात असल्याने कमकुवत शेळ्यांना चारा व्यवस्थित मिळत नाही व शेळ्यांचे वजन घटते. या समस्येवर उपाय म्हणून शेळ्यांचे व तसेच त्यांच्या जाती व शारीरिक स्थितीनुसार त्यांचे वर्गीकरण करणे नेहमीच योग्य असते. जर शेळ्यांमध्ये दातांची समस्या असेल तर यामुळे देखील वजन कमी होऊ शकते. दातांच्या समस्या मुळे चारा खाण्याच्या आणि गिळण्याच्या सामान्य प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. यामुळे शेळ्यांना पुरेशा चाऱ्यापासून वंचित राहावे लागते. या समस्येवर उपाय म्हणून वजन कमी करण्याच्या तपासणीमध्ये दात परिक्षण करून घेणे महत्त्वाचे असते. दातांची समस्या ही विविध प्रकारच्या खनिजांची कमतरता किंवा फ्लोरोसिसच्या अतिरेकामुळे होत असते. हार्ड स्टेनिंग हार्ड ड्राफ्टिंग, जबडा सुजणे हे देखील वजन कमी होण्याची प्रमुख कारणे आहेत. या समस्येचे निदान करायचे असेल तर शेळ्यांच्या तोंडाची तपासणी वेळोवेळी करावी. काही सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता जसे कॉपर, कोबाल्ट आणि सेलेनियम या आवश्यक सूक्ष्म पोषक घटकांच्या कमतरतेमुळे किंवा असंतुलनामुळे देखील शेळ्यांमध्ये वजन कमी होऊ शकते. कोबाल्टची कमतरता असली तर शरीराच्या वजनात वाढ होणे थांबते. सेलेनियम हे मेंढी पालन आणि शेळीपालन मध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या कमतरतेमुळे मादी प्राण्यांमध्ये गर्भपात आणि प्रजनन संस्थेचे समस्या वाढते. याच्या कमतरतेमुळे कोकरांची कमकुवत वाढ होते व विकास देखील थांबतो. एवढेच नाही तर कोकरामध्ये अचानक मृत्यूचे समस्या देखील दिसून येते. या समस्येला श्वेत स्नायू रोग म्हणतात. या समस्येवर उपाय म्हणून जनावरांना खनिज मिश्रण पावडर दिले गेले पाहिजे. जोन्स रोग मेंढी आणि शेळ्यांमधील जुनाट आजार आहे व हा वजन कमी करण्यासाठी कारणीभूत ठरतो. यामध्ये खाद्य योग्य प्रमाणात खाल्ले तरीही प्रादुर्भावित प्राण्याच्या जबड्यात खाली पाणी जमा होते, अशक्तपणा येतो तसेच मेंढ्यांमध्ये लोकर कमी होते, हगवन इत्यादी लक्षणे दिसतात. शेळ्यांच्या पायाला लंगडेपणा असणे हीदेखील एक समस्या असून हा रोग एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्यांमध्ये पसरतो व वजन कमी करत असतो. वरील दोन्ही कारणांसाठी पशुवैद्याच्या सल्ल्याने शेळ्यांना योग्य उपचार करावेत.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: ब्रम्हदेश (म्यानमार) चा मुक्तिदिन

### महत्वाच्या घटना

१४९३ : क्रिस्तोफर कोलंबस त्यांच्या पहिल्या सफरीच्या शेवटी नव्या जगातून परत निघाले.
१६४१ : कर भरायला नकार देणाऱ्या लोकप्रतिनिधींना पकडण्यासाठी इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स हाऊस ऑफ कॉमन्समध्ये शिरला. या अभूतपूर्व घटनेची परिणती यादवी युद्धात झाली. त्यात चार्ल्सचा पराभव होऊन मग त्याचा शिरच्छेद करण्यात आला.
१८४७ : सॅम्युअल कॉल्टने अमेरिकन सरकारला पहिले रिव्हॉल्व्हर पिस्तुल विकले.
१८८१ : लोकमान्य टिळक यांनी पुणे येथे 'केसरी' या वृत्तपत्राची सुरूवात केली.
१८८५ : आंत्रपुच्छ काढून टाकण्याची पहिली यशस्वी शस्त्रक्रिया डॉ. विल्यम डब्ल्यू. ग्रांट यांनी मेरी गार्टसाईड या रुग्णावर केली.
१९२६ : क्रांतिकारकांच्या गाजलेल्या काकोरी खटल्याच्या सुनावणीस लखनौ येथे सुरुवात झाली.
१९३२ : सविनय कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल पंडित नेहरूंना दोन वर्षांची शिक्षा
१९३२ : जवाहरलाल नेहरूआणिमहात्मा गांधीयांना इस्ट इंडिया कंपनी चे तेव्हाचे व्हाईस रॉय विलिंगडन यांनी अटक केली.
१९४४ : १० वर्षावरील सर्व मुलामुलींना राष्ट्राच्या युद्धसेवेत दाखल करुन घेण्याबद्दलचा हिटलरचा वटहुकूम जारी झाला.
१९४८ : ब्रम्हदेश (म्यानमार) ला (इंग्लंडपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९५२ : ब्रिटिश सैन्याने सुएझ कालव्याची नाकेबंदी केली.
१९५४ : मेहेरचंद महाजन यांनी भारताचे ३ रे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९५८ : १९५३ मध्ये माउंट एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करणारे सर एडमंड हिलरी दक्षिण धृवावर पोहोचले.
१९५८ : स्पुटनिक-१ हा पहिला मानवनिर्मित उपग्रह पृथ्वीवर परत उतरला.
१९५९ : लूना - १ हे अंतराळयान चंद्राच्या अगदी जवळ पोहोचले.
१९६२ : न्यूयॉर्क अमेरिका येथे पहिली चालकरहित रेल्वे सुरु झाली.
१९७२ : दिल्लीला क्रिमिनोलॉजी आणि फॉरेन्सिक विज्ञान संस्थेचे उद्घाटन.
१९९० : पाकिस्तान मध्ये दोन ट्रेन एकमेकांना धडकल्या मुळे ४०० लोक मारल्या गेले आणि ५०० पेक्षा अधिक लोक जखमी झाले.
१९९६ : साहित्यिक चंद्रकांत खोत यांच्या 'बिंब प्रतिबिंब' या कादंबरीला कोलकता येथील भारतीय भाषा परिषदेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला.
२००४ : नासाची मानवरहित स्पिरीट ही गाडी मंगळ ग्रहावर उतरली.
२०१० : 'बुर्ज खलिफा' या जगातील सर्वात उंच इमारतीचे उद्घाटन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४३ : इंग्लिश शास्त्रज्ञ आणि तत्त्वज्ञानी सर आयझॅक न्यूटन यांचा जन्म.
१८०९ : लुई ब्रेल - अंधांना उपयोगी पडणाऱ्या ब्रेल लिपीचे जनक व शिक्षक (मृत्यू: ६ जानेवारी १८५२)
१८१३ : सर आयझॅक पिटमॅन - शॉर्टहँड या लघुलिपीचे जनक (मृत्यू: १२ जानेवारी १८९७)
१८८७ : ला प्रसिद्ध लेखक लोचन प्रसाद पाण्डेय यांचा जन्म.
१८९२ : ला भारतीय अर्थशास्त्रज्ञ जे.सी. कुमारप्पा यांचा जन्म.
१९०० : अमेरिकन पक्षीय जेम्स बाँड यांचा जन्म.
१९०९ : मराठी नवसाहित्यिकार प्रभाकर पाध्ये यांचा जन्म.
१९१४ : इंदिरा संत साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या कवयित्री व लेखिका (मृत्यू: १३ जुलै २०००)
१९२४ : विद्याधर गोखले - नाटककार व संपादक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९९६)
१९२५ : प्रदीप कुमार - हिन्दी व बंगाली चित्रपटसृष्टीतील अभिनेता (मृत्यू: २७ आक्टोबर २००१)
१९३१ : ला भारतीय चित्रपट अभिनेत्री निरुपा रॉय यांचा जन्म.
१९४० : मराठी कादंबरीकार श्रीकांत सिनकर यांचा जन्म.
१९४१ : कल्पनाथ राय - केन्द्रीय मंत्री, राज्यसभा खासदार (३ वेळा), लोकसभा खासदार (४ वेळा), काँग्रेसचे नेते (मृत्यू: ६ ऑगस्ट १९९९ नवी दिल्ली)
१९६५ : भारतीय चित्रपट अभिनेते आदित्य पंचोली यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७५२ : गॅब्रिअल क्रॅमर - स्विस गणिती (जन्म: ३१ जुलै १७०४)
१८५१ : दुसरे बाजीराव पेशवे यांचे निधन.
१९०७ : गोवर्धनराम त्रिपाठी - गुजराथी लेखक, 'सरस्वतीचंद्र' हा गाजलेला चित्रपट त्यांच्याच चार भागांतील कादंबरीवर आधारलेला आहे. (जन्म: २० आक्टोबर १८५५ नडियाद, गुजराथ)
१९०८ : राजारामशास्त्री भागवत - विद्वान व समाजसुधारक, ज्ञानाच्या क्षेत्रातील मोठे प्रज्ञावंत, शिक्षणविषयक स्वतंत्र ध्येये असल्यामुळे त्यांनी १८८४ मध्ये बॉम्बे हायस्कूल आणि पुढे मराठा हायस्कूल काढले. हिन्दूधर्म विवेचक पत्राचे ते काही वर्षे संपादक होते. (जन्म: ११ नोव्हेंबर १८५१ कशेळी, राजापूर, रत्नागिरी)
१९३१ : ला भारताचे प्रसिद्ध पत्रकार मुहम्मद अली यांचे निधन.
१९६१ : आयर्विन श्रॉडिंगर - नोबेल पारितोषिक विजेता ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १२ ऑगस्ट १८८७)
१९६५ : टी. एस. इलियट - अमेरिकेत जन्मलेले ब्रिटिश कवी, नाटककार, टीकाकार आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २६ सप्टेंबर १८८८)
१९९४ : राहूलदेव बर्मन तथा 'पंचमदा' - संगीतकार (जन्म: २७ जून १९३९)
२०१६ : ला भारताचे ३८ वे न्यायाधीश एस. एच. कपाड़िया यांचे निधन.





राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत






# जिल्हा प्रशासनाकडून महानगरपालिका निवडणूकीसाठी तयारी पूर्ण -जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिकाची निवडणूक मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे. यासंदर्भात मतदार जनजागृती अभियान मतदान करिता प्रतिज्ञा घेण्यात आली. शहरात विविध वस्ती मध्ये महिलांना मतदान बाबत महत्व देण्यात आले. विविध ठिकाणी महिला करिता सेल्टी ठेवण्यात आले. जेष्ठ नागरीकांकडून मतदार जनजागृती बावत आव्हान करण्यात आले. आठवडी बाजाराच्या ठिकाणी जनजागृती. शाळेतील मुलांचे रॅलीव्दारे आव्हान. घंटागाडीव्दारे जिंगल वाजविण्यात आले. नवमतदार व्दारे आवाहन करण्यात आले. शहरातील ॲटोरिक्षा वर बॅर्नर लावण्यात आलेली आहे. बस स्टॅण्ड, रेल्वेस्टेशन येथे सेल्फी ठेवण्यात आले आहे. सार्वजनिक विविध ठिकाणी बॅर्नर व होल्डींग लावण्यात आलेल्या आहेत. शाळेतील मुलाकडून जनजागृती संदर्भात रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, विविध धर्मगुरु- खिश्चन, बौध्द, हिंदु, मुस्लीम धर्मगुरु यांच्या मार्फत आव्हान केले. विविध भजनमंडळीत माध्यमातून आवाहन करण्यात आले.



दिनांक २३.१२.२०२५ ते ३०.१२.२०२५ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय येथे मतदार जनजागृती अभियान घेण्यात आले, अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका चे आयुक्त आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, महानगरपालिकाचे केशव कानपुडे तसेच महानगरपालिका चे संबंधित अधिकारी उपस्थित होते. याबाबत पत्रकार परिषद मध्ये माहिती देताना जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाले की, निवडणूक खर्चासाठी ७ कोटी रुपयाची अपेक्षा आहे यासाठी महानगरपालिका कडे साडेतीन कोटी उपलब्ध असल्याचे माहिती देण्यात आली. तसेच एमआयडीसी या भागातून पण अजून काही वसुली करण्यात येणार आहे यामुळे निवडणूकसाठी निधी कमी पडणार नसल्याचे सांगण्यात आले. तसेच कमीत कमी खर्चामध्ये ही निवडणूक पार पडणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. जिथे मुला मुलीचे शिक्षण सुरू आहे त्या ठिकाणी मतमोजणीसाठी जागा घेण्यात आली नाही. याचे कारण ते म्हणाले की मुला -मुलींच्या शिक्षणाचे नुकसान होणार नाही याची दक्षता जिल्हा प्रशासनाने घेतलेली आहे. यासाठी खासगी जागेवर मतमोजणी होणार आहे. जालना महानगरपालिका राज्यातील २९ वी महानगरपालिका म्हणून

दोन वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या जालना शहर महानगरपालिकेची ही पहिलीच निवडणूक आहे. जालना शहर महानगरपालिकेची निवडणूक येत्या १५ जानेवारी रोजी होणार असून, शुकवार, २ जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख होती. दरम्यान, दुपारी जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी पत्रकारांशी संवाद साधला. निवडणुकीच्या अनुषंगाने झालेल्या तयारीची माहिती मनपाचे उप आयुक्त केशव कानपुडे यांनी दिली. त्यावर बोलताना मित्तल म्हणाल्या, निवडणुकीसाठी साधारणपणे ७ कोटी निधीची गरज असून निवडणुकीचा खर्च महानगरपालिकेच्या निधीतून करू. त्यासाठी पालिकेने कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविल याचा फायदा झाला. शहरातील नागरिकांनी कर भरण्यासाठी पढाकार घेतला. आतापर्यंत महानगरपालिका ने मोठ्या प्रमाणात वसुली करण्यात आली आहे. खर्च महानगरपालिकेच्या निधीतून करू. त्यासाठी पालिकेने कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविली. याचा फायदा झाला. शहरातील नागरिकांनी कर भरण्यासाठी पुढाकार घेतला. आतापर्यंत पालिकेकडे ३ कोटी ५० लाखांचा कर जमा झाला आहे. याशिवाय शासनाचा निधी देखील येईलच. तसेच शासनाकडे वस्तू व सेवा कर आणि स्टँपड्युटीचा निधी शासनाकडे प्रलंबित आहे, तो सुद्धा मिळणार आहे. त्यामुळे निवडणूक खर्च भागवण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले. महानगरपालिकेची ही पहिलीच निवडणूक असल्यामुळे आम्हाला कमी खर्चात ती उत्तमरित्या पार पाडायची आहे. त्यासाठी आम्ही निवडणुकीतील खर्चाला देखील कात्री लावली आहे. कमीतकमी खर्चात निवडणूक घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहे, असेही शेवट जिल्हाधिकारी आशिमा शितल त्यांनी सांगितले.

# मोटार वाहन निरीक्षकांचा तालुकानिहाय दौरा निश्चित

अहिल्यानगर । प्रतिनिधी

येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाने जानेवारी ते जून २०२६ या कालावधीतील मोटार वाहन निरीक्षकांचा तालुकानिहाय दौरा निश्चित केला असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली आहे.

प्रत्येक तालुक्याचा मासिक दौरा निश्चित करण्यात आला असून, संबंधित दिवशी शासकीय किंवा सार्वजनिक सुट्टी असल्यास, किंवा प्रशासकीय कारणांमुळे दौरा रद्द झाल्यास, त्याची पुढील तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाईल. शिबिरात अपुरी कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाहीत. सर्व शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरावे लागतील. दौऱ्याच्या ठिकाणी परराज्यातून आलेली वाहने तसेच बसची तपासणी केली जाणार नाही. शिबिर आयोजित केलेल्या तालुक्यातील नागरिकांचीच कामे केली जातील. तपासणीसाठी येणाऱ्या तात्पुरत्या नोंदणी झालेल्या, परिवहनेतर वाहनांसाठी हमीपत्र (डिसक्लेमर) आवश्यक आहे. हमीपत्र नसलेल्या वाहनांची तपासणी केली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

शेवगाव तालुका -जानेवारी : ७ व २०. फेब्रुवारी : ५ व २०, मार्च: ५ व २०, एप्रिल : ६ व २१, मे : ७ व १९, जून : ८ व २२. श्रीगोंदा तालुका -

जानेवारी: ८ व २१, फेब्रुवारी: ६ व २३, मार्च: ६ व २३, एप्रिल: ७ व २२,

मे: ८ व २०, जून: ९ व २३. कर्जत तालुका - जानेवारी: ९ व २२, फेब्रुवारी: ९ व २४, मार्च: ९ व २४, एप्रिल: ८ व २३, मे: ११ व २१, जून: १० व २४. पाथर्डी तालुका - जानेवारी: १२ व २७, फेब्रुवारी: १० व २५, मार्च: १० व २५, एप्रिल: ९ व २७, मे: १२ व २५, जून: ११ व २. पारनेर तालुका - जानेवारी: १३ व २८, फेब्रुवारी: ११ व २६, मार्च: ११ व २७, एप्रिल: १० व २८, मे: १३ व २६, जून: १२ व २९. जामखेड तालुका - जानेवारी : १४ व २९, फेब्रुवारी : १२ व २७, मार्च : १२ व ३०, एप्रिल : १५ व २९, मे: १४ व २८, जून : १५ व ३०, काष्टी -१५ जानेवारी, १६ फेब्रुवारी, १६ मार्च, १६ एप्रिल, १८ मे व १६ जून.

# रस्ता सुरक्षा अभियान : हेल्मेट जनजागृती रॅली संपन्न

अंबड प्रतिनिधी

अंबड येथे ३ जानेवारी रोजी राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत हेल्मेट रॅली चे आयोजन उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांच्या मार्गदर्शनाखाली रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



वाहतुकीचे नियम पाळा अपघात टाळा

या रॅलीचे उद्घाटन अंबडचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सिद्धेश्वर धुमाळ, पो. नि. संतोष घोडके, सहा. पो. नि. जिल्हा वाहतूक शाखा प्रमुख चंद्रकांत चातुरे, अंबड न. प. चे मुख्याधिकारी श्री मनोज उकिरडे, मोवानि भीमराज नागरे, यांनी रॅलीस हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केले. यावेळी वाहतूक पोलीस कर्मचारी यांनी रॅलीत सहभाग घेतला. डॉ. धुमाळ, पोलीस निरीक्षक संतोष घोडके, मोटर वाहन निरीक्षक भीमराज नागरे, केंद्रे मॅडम, यांनी स्वतः हेल्मेट परिधान करून दुचाकी चालवून सुरक्षित प्रवासाबाबत जनजागृती करण्याचे काम केले. रॅलीची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून करून मत्स्योदरी देवी मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे महाराष्ट्र द्वार- जुनी भाजी मंडी- पेठ गल्ली - पाचोड रोड ते तहसील कार्यालय अंबड येथे रॅलीची सांगता करण्यात आली. रॅली दरम्यान नागरिकांना दुचाकी चालवताना हेल्मेट तसेच चारचाकी चालवताना सीटबेल्ट वापरण्यास आवाहन करण्यात आले, तसेच वाहतुकीचे सर्व नियम पाळून अपघात टाळण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले व रॅली समारोप करताना मोटार वाहन निरीक्षक भीमराज नागरे व शुभम मोटे यांनी केले. रॅलीमध्ये देवा फौंडेशन द्वारे संचालित रस्ता सुरक्षा चित्ररथ, सोबतच एकूण ५० मोटारसायकल तसेच २० चारचाकी गाड्या यांनी सहभाग घेतला. रॅलीचे सूत्रसंचालन सहा.राजकुमार मुंडे यांनी केले. रॅलीच्या आयोजना उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक शुभम मोटे,सहा. मोटार वाहन निरीक्षक कुमावत, इरफान खान, चालक घुले, पारिस्कर, थोरात व इतर कर्मचारी, वाहतूक शाखा यांचे अधिकारी व कर्मचारी तसेच अष्टविनायक,न्यू समर्थ ड्रायव्हिंगचे बोबडे, गाडेकर, देवा जगदंबा श्री.माऊली अरिहंत व इतर सर्व मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक व कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला.

# लुटमार करणारी ४ जणांची टोळी पकडली

## वाढदिवस साजरा करण्यासाठी केली होती लुटमार

जालना प्रतिनिधी

निलेश अग्रवाल हे श्रीकृष्ण-रुक्मिणी नगर इथून स्कुटीवर घरी जात असतांना रात्री ११.३० वाजता अडवून मोटार सायकलवर आलेल्या चार आरोपीच्या टोळक्याने चाकूचा धाक दाखवत व तोंडावर नाकावर मारहाण करून गंभीर जखमी केले व १२,०००/- रुपये लुटुन नेल्याची गंभीर घटना घडली होती. या प्रकरणी पोलीस ठाणे चंदनझिरा येथे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी सदरचा गुन्हा उघडकीस करण्या बाबत चंदनझिरा पोलीसांना



सुचना केल्या होत्या. चंदनझिरा पोलीसांनी पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांचे नेतृत्वात तपासास गती दिली व कोणतीही दिरंगाई न करता सखोल तपास सुरू केला. गुप्त बातमीदार नेमुण, गोपनीय माहितीच्या आधारे सदरचा गुन्हा आरोपी बाळा जगन्नाथ पिंपराळे वय १९ वर्षे, दिपक भगवान निर्मल वय २० वर्षे, अजय बबन पवार वय १८ वर्षे तीघे रा. द्वारकानगर नविन मोंढ्याजवळ जालना व विशाल धुराजी हिवाळे वय २२ वर्षे रा. हिंदनगर नविन मोंढा जवळ जालना यांनी केला असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हेगारांवर कडक कारवाई करत चंदनझिरा पोलिसांनी आरोपींना मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले असून त्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडे विचारपूस करता वाढदिवस साजरा करण्यासाठी पैशांची आवश्यकता असल्याने घरी जात असलेल्या व्यापाऱ्यास चाकुचा धाक दाखवुन लुटमार केली असल्याचे आरोपींनी सांगीतले. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ.अशोक जाधव हे करीत आहेत. आरोपींनी वाढदिवस साजरा करण्यासाठी व मौजमस्ती तसेच नशापाणी करण्यासाठी सदर जबरी चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, हुल्लडबाजी करण्यासाठी गंभीर गुन्हा केल्याने तरुणाई चुकीच्या दिशेने जात असल्याचे हे गंभीर वास्तव समोर आले आहे.

# गुटखा वाहतुक करणारा टेम्पो पकडला; १९ लाखांचा मुद्देमाल जप्त

जालना । प्रतिनिधी

जाफ्राबाद येथील टेभुर्णी रोडवर टाटा ४०७ वाहनामध्ये मानवी आरोग्यास घातक असलेला प्रतिबंधीत गुटखा, प्रतिबंधीत तंबाखु घेवुन जात असल्याची माहिती मिळाल्याने सदर टाटा ४०७ वाहन थांबवुन वाहन चालक अस्लम शेख नूर शेख वय ३७ वर्षे, रा.शेरसवारनगर जालना याच्या ताब्यातून वाहनासह १९ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेकडून करण्यात आली.

जालना जिल्ह्यात अवैध गुटखा वाहतुक व विक्री करणारे संबंधी गुटखा माफियाची माहिती घेऊन कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, व पथकास सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक पंकज जाधव स्थागूशा यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा यांनी स्वागुशाचे विशेष पथक तयार करुन कारवाई करण्याबाबत मार्गदर्शन केले होते. त्यानुसार वरील ठिकाणी कारवाई करण्यात आली. यावेळी ७,७१,३००/रुपये किंमतीचा गोवा १००० गुटखा पान मसाला व तंबाखु गुटखा १,८८,३००/ रुपये किमती, अलीचाबा पान मसाला गुटखा व तंबाखू ९९,२००/- रुपये किमंतीचा, राजनिवास गुटखा पान मसाला, २,३०,१८०/- रुपये किंमतीचा, डायरेक्टर पान मसाला, धारिवाल स्वदेशी तंबाखु, शॉट ९९९ अशी प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु असा एकूण १०,७९,९८० रुपयाचा माल मिळून आला. तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेले वाहन रु. ७,००,०००/- किंमतीचे टाटा ४०७ वाहन असे एकूण १९,७९,९८०/- रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुध्द सरकारतर्फे फिर्यादीवरुन जाफ्राबाद पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल, मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, यांचे मार्गदर्शनाखाली मा. पोलीस निरीक्षक पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा यांच्यासह त्यांच्या पथकाने कारवाई केली आहे.


# जिल्हाधिकारी करणार पाणी पुरवठा योजनांच्या कामांची पाहणी

## तांत्रिक तपासणीतील झालेल्या त्रुटीची पुर्तता करा -आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

नागरिकांना पाणी उपलब्ध करुन देणे पुण्याचे काम आहे. नळाद्वारे पाणी उपलब्ध झाल्याने ग्रामीण महिला वर्गाचे आयुष्य पुर्णतः बदलणार आहे. नागरिकांसाठी पाणी पुरवठा हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. पुढील दहा वर्षाचा विचार करता जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर असलेली ग्रामीण पाणी पूरवठ्याची कामे वेळेत आणि गुणवत्तापुर्ण होणे गरजेचे आहे. जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांची टाटा कन्सलटन्सी या त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक तपासणी करण्यात येत असून अहवालानूसार प्राप्त झालेल्या त्रुटीची पुर्तता तातडीने करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हास्तरावर स्थापन केलेल्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनची बैठक शुक्रवार दि.२ जानेवारी २०२६ रोजी पार पडली. या प्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीस कार्यकारी अभियंता सर्जेराव शिंदे, महाराष्ट्र



जीवन प्राधिकरण अभियंता श्री.पाध्ये, उप अभियंता श्री.बोडखे, श्री.जवंजाळ, श्री.ठाकुर, स्वच्छता तज्ञ नम्रता गोस्वामी, उप कार्यकारी अभियंता पुजा बुलबुले, श्री.घोरपडे यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील अंबड, बदनापूर, भोकरदन, घनसावंगी, जाफ्राबाद आणि जालना या तालूक्यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पूरवठा योजनेची कामे मंजूर झालेली आहे. तर उर्वरीत १२० व ७० गावांसाठी परतूर व मंठा तालुक्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यंत्रणेद्वारे २ ग्रीड पाणी पूरवठा योजना राबविण्यात येत आहेत. कंत्राटदारानेही गुणवत्तेचे काम करणे आवश्यक असून योजनेतील निकषानूसार शाखा अभियंत्यांनी प्रत्यक्ष हजर राहत कामे काळजीपुर्वक करावी, कामात कसूर केल्यास हयगय केली जाणार नाही. या कामात समावेश असलेल्या उपअभियंता यांनी केवळ कागदोपत्री कामे न करता आठवडाभरात किमान ४ वेळा क्षेत्रभेट देवून कामाची तपासणी करावी. मी सुध्दा विविध तालुक्यातील कामांना भेट देवून पाहणी करणार आहे. तरी प्रत्येक कामांचे जिओ टॅगिंग छायाचित्र व व्हिडीओ अहवालासोबत सादर करावेत. दिलेल्या उद्दीष्टानूसार काम न केलेल्या अभियंता आणि कंत्राटदारविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. पाणी पुरवठा विभागामार्फत सद्यस्थितीत सुरु असलेल्या कामाबाबत माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी यावेळी दिली. यामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात एकुण ७३३ कामे मंजूर असून अंबड-१३८, बदनापूर-८१, भोकरदन-१५५, घनसावंगी-११८, जाफ्राबाद-११४ आणि जालना -१२७ या प्रमाणे आहेत. यापैकी ३१५ कामे पुर्ण झाली असून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तर ४०० उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकमार्फत ७ कामे सुरु आहेत. यावेळी संपुर्ण स्वच्छता अभियानातंर्गत जिल्ह्यातील सुरु असलेल्या कामाचाही आढावा घेण्यात आला. या बैठकीस शिक्षण, कृषी, वने, भुजल सर्वेक्षण आदि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# गुन्हेगारीची मुळे अज्ञानात; अभ्यासक्रमातच गुन्ह्यांसह शिक्षेच्या माहितीचा समावेश करा

## कारागृहातील अनुभवावरून बिभीषण चाटे यांची थेट राष्ट्रपतींकडे मागणी

बीड प्रतिनिधी

कारागृहांमध्ये वाढणारी गुन्हेगारी व बालगुन्हेगारी ही केवळ प्रवृत्ती नसून कायद्याविषयीच्या अज्ञानातून जन्माला येणारी गंभीर समस्या असल्याचा निष्कर्ष कारागृहातील प्रत्यक्ष अनुभवातून बिभीषण उर्फ शिवाजी महादेव चाटे (रा.साकुड,ता.अंबाजोगाई) यांना आला. त्याच धक्कादायक अनुभवावरून त्यांनी थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना एक पत्र लिहिले. त्यामध्ये इयत्ता पाचवी ते दहावीच्या शालेय अभ्यासक्रमातच गुन्हे व त्यावरील शिक्षांशी संबंधित महत्त्वाची कलमे समाविष्ट करावीत, अशी मागणी केली. जेणेकरून, किशोरवयातच कायद्याचे शिक्षण दिल्यास गुन्हेगारीला आळा बसेल, असे सांगत अल्पवयीन गुन्हेगारीसारख्या गंभीर विषयाकडे त्यांनी लक्ष वेधले. मात्र प्रशासन, शासन स्तरावरून दखल घेतली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

बिभीषण उर्फ शिवाजी चाटे यांनी निवेदनात म्हटले की, दि.४ डिसेंबर २०११ रोजी एका प्रकरणातील आरोपामुळे त्यांना बीडच्या कारागृहात दाखल केले होते. सदर प्रकरणात दि.२२ ऑगस्ट २०१४ रोजी न्यायालयाच्या निकालानुसार त्यांची सुटका झाली. सन २०११ ते २०१४ या कालावधीत बीड कारागृहात असताना त्यांनी विविध आरोपांखाली दाखल झालेल्या युवकांशी संवाद साधला. यावर अनेकदा अभ्यासही केला. सुमारे ९८ टक्के आरोपींना आपण केलेल्या कृत्यामुळे कोणता गुन्हा नोंदवला जाऊ शकतो आणि त्यासाठी काय शिक्षा होऊ शकते, याची कोणतीही पूर्वकल्पना नव्हती. राग, भावनिक आवेश, अज्ञान किंवा परिस्थितीच्या दबावाखाली युवक गंभीर स्वरूपाची कृत्ये करतात आणि नंतर आयुष्यभर कारावास, सामाजिक बहिष्कार व मानसिक तणाव



भोगावा लागतो, अशी वस्तुस्थिती त्यांनी मांडली आहे. कारागृहातील वास्तव अधिक चिंताजनक असल्याचे नमूद करताना चाटे यांनी सांगितले की, तरुण आरोपी मानसिकदृष्ट्या खचलेले असतात. अशा अवस्थेत ते व्यसनाधीनतेकडे वळतात. काही सराईत गुन्हेगारांकडून त्यांना आमिष दाखवून गुन्हेगारी प्रवाहात ओढले जाते. जामिनावर सुटून बाहेर आल्यानंतरही हे युवक पुन्हा गुन्हे करतात आणि गुन्हेगारीचे दुष्टचक्र अधिक घट्ट होते. कारागृहांमध्ये सीसीटीव्ही व्यवस्था असली तरी काही अंतर्गत भागांमध्ये देखरेखीचा अभाव असून, दबाव किंवा भीतीपोटी युवकांवर होणाऱ्या अन्यायकारक व अनैसर्गिक कृत्यांची अधिकृत नोंद होत नसल्याची गंभीर बाबही त्यांनी निवेदनात मांडली. यामुळे अनेक युवक मानसिक व शारीरिकदृष्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त होतात. या पार्श्वभूमीवर, ११ ते १६ वयोगटातील मुलांना भारतीय संविधान काय करण्याची परवानगी देते आणि काय करण्यास मनाई करते, याची माहिती शालेय शिक्षणातून दिली गेली पाहिजे, असे मत चाटे यांनी व्यक्त केले आहे. गुन्हेगारी, लैंगिक अत्याचार, महिलांवरील अन्याय, हुंडाबळी, जाच-जुलूम यांसारख्या सामाजिक समस्यांची मुळेही कायद्याविषयीच्या अज्ञानातच दडलेली असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे. निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शैक्षणिक धोरणांमध्ये आवश्यक बदल घडवून आणावेत, जेणेकरून भावी पिढी गुन्हेगारीपासून दूर राहून सुसंस्कृत, कायदाभिमुख आणि सक्षम भारताच्या निर्मितीत सहभागी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

# पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता लाच घेताना अटक

जालना प्रतिनिधी

तक्रारदार यांची पुनर्वसनासाठी शासनाने संपादन केलेल्या शेतजमिनीचा मोबदला जमा केला म्हणून व गावठानच्या घराचा शासनाने दिलेल्या मावेजाचा चेक तक्रारदार यांना देण्यासाठी रोहीत प्रल्हाद देशमुख, वय ३५ वर्षे, पद कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जालना यांनी १ लाख रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना पकडण्यात आले. ही घटना लघु पाटबंधारे विभाग, कार्यालय जालना येथील देशमुख यांच्या कक्षात घडली.

तक्रारदार यांची शेतजमिन पुनर्वसनासाठी शासनाने संपादन केली असून त्याचा मोबदला म्हणून तक्रारदारास १,८८,३६,०९४/-रुपये चा चेक शासनाकडून मिळाला. तो बँक खात्यावर दि.२९.०७.२०२५ रोजी जमा झाला आहे. सदर रक्कम खात्यावर जमा झाल्याबद्दल देशमुख कार्यकारी अभियंता, यांनी सुमारे चार महिन्यांपुर्वी तक्रारदाराकडे त्यांच्या कार्यालयात सात लाख रुपये लाचेची मागणी केली. त्याच दिवशी तक्रारदाराने देशमुख यांना चार लाख रुपये दिले होते. त्यानंतर राहिलेल्या तीन लाख रुपयासांठी देशमुख यांनी तकादा लावला होता. तसेच पुनर्वसनामध्ये तक्रारदाराच्या गावठानच्या घराचा शासनाने दिलेल्या मावेज्याचा चेक ताक्रारदार यांना देण्यासाठी ॲडव्हान्स म्हणून तक्रारदार यांच्याकडून, तक्रारदाराच्या सहीचे दोन कोरे चेक घेतले आहेत. दि.३०.१२.२०२५ रोजी तक्रारदार यांनी देशमुख यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी तक्रारदार यांना दि.३०.१२.२०२५ रोजी भेटण्यासाठी वाटूर फाटा येथे बोलावले. परंतु तक्रारदार यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ३०/१२/२०२०५ रोजी ला. प्र. वि. कार्यालय जालना येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीवरुन दि.३०.१२.२०२५ रोजी वाटूर फाटवाजवळील, मंठा रोडवरील रामदेव रायका हॉटेलमध्ये पंचासमक्ष तक्रारीची पडताळणी केली त्यातून सत्यता समोर आली आणि त्यानुसार कारवाई करण्यात आली.

# जीवघेणा हल्ला झालेल्या बांगर आणि राख कुटुंबावरच ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका धक्कादायक प्रकार समोर आला असून, ज्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला, त्यांच्यावरच पोलिसांनी रात्री उशिरा खोटा ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमधून पाटोदा पोलिसांचा तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाकर पांडुरंग बांगर, जयश्री प्रभाकर बांगर, सौरभ प्रभाकर बांगर, सूरज प्रभाकर बांगर आणि महादेव रामराव राख यांच्यावर काल रात्री ९:३० वाजता ट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**पाटोदा पोलिसांकडून अन्यायकारक कारवाई?**

बांगर आणि राख कुटुंबातील सदस्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्यावर आधी समोरच्या गटाकडून जीवघेणा हल्ला करण्यात आला. मात्र, पाटोदा पोलिसांनी खऱ्या गुन्हेगारांना सोडून देऊन, उलट पीडित कुटुंबावरच गंभीर कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. हा गुन्हा पूर्णपणे खोटा आणि सूडबुद्धीने करण्यात आल्याचा आरोप कुटुंबाने केला आहे.

### पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

एकीकडे राज्यात कायद्याचे राज्य असल्याचे सांगितले जात असताना, पाटोदा पोलिसांनी तक्रारीची शहानिशा न करता थेट गुन्हा दाखल केल्याने संताप व्यक्त होत आहे. ज्यांनी हल्ला केला ते मोकाट आहेत आणि ज्यांना मार लागला त्यांच्यावरच केसेस केल्या जात आहेत, हा कसला न्याय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.या गंभीर अन्यायाविरोधात आता सामाजिक स्तरावर पडसाद उमटण्याची शक्यता असून, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणात लक्ष घालून निष्पाप लोकांवरील गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी होत आहे.

# सावित्रीच्या लेकींची क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनानिमित्त बाईक रॅली उत्साहात

परळी । प्रतिनिधी

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या तथा थोर समाज सुधारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शहरात सावित्रीच्या लेकींच्या बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले यास मोठा प्रतिसाद मिळाला.




लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सावित्रीच्या लेकींची क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनानिमित्त बाईक रॅली काढण्यात आली. सुरुवातीला शनिवारी (ता.०३) सकाळी १०.३० वाजता संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ .विद्या देशपांडे, संचालिका छायाताई देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ विवेकानंद कवडे, प्रा प्रविण फुटके यांच्या उपस्थितीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख यांनी सावित्रीबाई फुले यांच्या असामान्य कार्याचा आढावा घेतला . ते म्हणाले की , स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या व जनयित्री म्हणून सावित्रीबाई फुले यांचेच नाव अग्रक्रमाने येते . त्यांच्याच ◀◀ पान ३ वर

# कडा सहकारी साखर कारखाना सुरू करण्याची इच्छा; मात्र डाव वेगळा असल्याचा आरोप

आष्टी । प्रतिनीधी

कडा सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू व्हावा, ही इच्छा आमचीही आहे.मात्र माजी आमदार धोंडे साहेबांचा खरा डाव वेगळाच असून त्यांना या कारखान्याची मौल्यवान जमीन हडप करायची असल्याचा गंभीर आरोप कामगार पुत्र प्रताप थोरवे यांनी केला आहे.




कडा साखर कारखानातील कर्मचारी थकीत वेतन मागणीसाठी सर्व कर्मचारी नियोजन बैठक शुक्रवार (दि.२)रोजी सकाळी ११ वा.आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत कामगार पुत्र प्रताप बाळासाहेब थोरवे बोलत होते.

पुढे बोलतांना थोरवे यांनी सांगितले की, कारखाना सुरू करण्याच्या नावाखाली दिशाभूल केली जात असून प्रत्यक्षात कारखान्याच्या मालमत्तेवर डोळा ठेवण्यात आला आहे. याशिवाय या कारखान्यासाठी आवश्यक असलेला निधी सर्व नियम धाब्यावर बसवून महेश मल्टीस्टेट पतसंस्थेकडून उभारण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला.

कारखान्याच्या व्यवहारात पारदर्शकता नसून, कामगारांच्या हक्कांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणीही प्रताप थोरवे यांनी यावेळी केली.दरम्यान,या आरोपांबाबत धोंडे साहेब किंवा संबंधित संस्थांकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही.

# भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतले संत वामनभाऊ महाराजांचे आशीर्वाद

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हावासियांचे श्रद्धास्थान असलेले थोर संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड येथे दि.३ ते १० जानेवारी दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शनिवारी (दि.३) गहिनीनाथ गड येथे भेट देऊन संत वामनभाऊ महाराजांच्या समाधीचे आणि महंत ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री यांचे दर्शन घेतले.



गडाचे महंत ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताह सोहळ्याचा शुभारंभ व दर्शन सोहळा संपन्न झाला. अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानयज्ञाच्या या अध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होण्याचे सौभाग्य लाभल्याची भावना डॉ.योगेश ◀◀ पान ३ वर

# विकासाला गती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू

## नूतन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी स्वीकारला पदभार

**परळी । प्रतिनिधी**

**परळीच्या नूतन नगराध्यक्ष पद्मश्री ताई बाजीराव धर्माधिकारी यांनी शनिवारी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी परळीच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करू अशी ग्वाही दिली.**



यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी तमाम परळीकरांचे जाहीर आभार व्यक्त केले. त्याचबरोबर आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी आपण नगराध्यक्ष म्हणून पदभार घेतला ही खूप मोठी जबाबदारी आहे याची आपल्याला जाणीव असल्याचे सांगितले. आ. धनंजय मुंडे व ना. पंकजाताई मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली निश्चितच परळीच्या विकासाला नवी गती आणि दिशा प्राप्त होणार आहे. परळीचा चौफेर आणि सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व सहकारी नगरसेवक, सर्व कार्यकर्ते, परळीकर जनता प्रशासनातील अधिकारी ,कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने आपण परळीला एका नव्या विकासाच्या उंचीवर घेऊन जाऊ. यासाठी सर्वांनी साथ आणि आशीर्वाद द्यावेत असे आवाहन करून विकासाला नवी गती देण्याचा आपण नगराध्यक्षा म्हणून प्रामाणिक प्रयत्न करू अशी ग्वाही सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी यावेळी दिली.

सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी दरम्यान, यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून नवनिर्वाचित नगराध्यक्षा ◀◀ पान ३ वर

# हॉटेल कामगार २० वर्षीय तरुणाने संपवले जीवन

## सांगवी शिवारातील धक्कादायक घटना

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी (पाटण) शिवारात एका २० वर्षीय तरुणाने नदीकाठच्या झाडाला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी रात्री समोर आली आहे. भाऊसाहेब ऊर्फ बावड्या राम खंडागळे (वय २०) असे मयत तरुणाचे नाव असून, त्याच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.



भाऊसाहेब हा तरुण गेल्या अनेक वर्षांपासून गावाजवळच एका हॉटेलवर कामगार म्हणून काम करत होता. त्याचे वडील भोळसर असल्याने चुलते त्यांना ऊसतोडीला सोबत नेतात, तर आई कधी पुण्यात तर कधी गावी असते. भाऊसाहेब स्वतः चुलत्याच्या घरी राहून कुटुंबाला आधार देत होता. शुक्रवारी तो गव्हाच्या पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेला होता. मात्र, रात्री उशिरापर्यंत तो घरी न परतल्याने चुलत भाऊ आणि नातेवाईकांनी शोध सुरू केला असता, घरापासून जवळच असलेल्या नदीकाठच्या झाडाला त्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.

# वकील संघाच्या उपाध्यक्षपदी ॲड. के.डी.काळे यांची बिनविरोध निवड

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी वकील संघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये वडवणी न्यायालयात हुशार विधीज्ञ म्हणून काम करणारे के डी काळे साहेब यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते बिननिरोध निवड करण्यात आलेली आहे.



वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील रहिवासी शेतकरी कुटुंबातील व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन एलएलबी पदवी प्राप्त करून वडवणी न्यायालयात हुशार मनमिळाऊ व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे भारत सरकार नोटरी प्राप्त विधीज्ञ केडी काळे यांनी वडवणी येथील संघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये उपाध्यक्ष पदाकरिता उमेदवारी अर्ज दाखल केलेला होता . यामध्ये त्यांनी आत्तापर्यंत वडवणी वकील संघासाठी तळमळीने केलेल्या कामाची पावती म्हणून तसेच वकिलांच्या सदैव कोणतेही अडचणीमध्ये व कामांमध्ये अग्रेसर असणारे काळे यांची वकील संघाच्या सर्व पदाधिकारी सदस्य यांनी उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड केलेली आहे तरी काळे यांची वकील संघाच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल वडवणी शहरासह तालुक्यात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. वकील संघाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वकील संघाचेवतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# गणपत खेडकर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

## एसटी महामंडळात खेडकर यांनी निष्पृह व प्रामाणिक सेवा केली– आगारप्रमुख मस्के

बीड । प्रतिनिधी

गेवराई आगारातील एसटी कंडक्टर गणपत खेडकर यांनी ३६ वर्षे सहा महिने निस्पृह, निष्कलंक व प्रामाणिक सेवा केली. प्रवाशांची सेवा, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी सौदाह्य पूर्ण वागणूक आणि एसटी संघटनेतही त्यांनी मोठे योगदान दिले, असे गौरव उद्गार आगार प्रमुख लक्ष्मण मस्के यांनी काढले.



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या गेवराई आगारातील वाहक तथा सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान असलेले गणपत खेडकर उर्फ गणूआबा यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा गेवराई आगाराचे आगारप्रमुख लक्ष्मण मस्के यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी महामंडळातील अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, वाहन चालक, वाहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माजी पंचायत समितीचे माजी सदस्य शेख तय्यब, फाळके नाना, अमर टेलर,नागेश खेडकर आदींची गुणगौरव करणारी भाषणे झाली.

प्रारंभी गणपत खेडकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास राज्य परिवहन महामंडळाचे आजी, माजी कर्मचारी, गेवराई वकील पदाधिकारी व विधीज्ञ, माजी सरपंच रामेशलाल जाजू, माजी पंचायत समिती सदस्य शेख तय्यब, माजी सरपंच ◀◀ पान ३ वर




# पै.सतीश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाची रेलचेल!

आष्टी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिवसभर रक्तदान शिबिर तर संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सत्कार स्वीकारण्यासाठी दिवसभर घरी तर चारच्या नंतर कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

युवकांना उद्योग व्यवसायाकडे घेऊन जाणारे सर्वांच्या हक्काचे पै. सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी विविध उपक्रम आयोजित केले जातात मग उद्योग व्यवसायासाठी मार्गदर्शन असेल सुशिक्षित युवकांसाठी नोकरीचे महोत्सव असेल तसेच



सांस्कृतिक कार्यक्रम रक्तदान शिबिर वृक्षारोपण इत्यादी उपक्रमाची आयोजन करण्यात येत असते याही वर्षी असेच आयोजन केले असून रक्तदान शिबिर आणि सांस्कृतिक कार्यक्रम विशेष असणार आहेत

### दिवसभर रक्तदान शिबिर तर रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

### पै.सतीश शिंदे हे ३६४ दिवस जनतेकडे जातात तर जनता हक्काने एक दिवस आबांकडे येते!

या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन योगेश मुटकुळे, अमोल दरेकर, इरफान शेख, श्याम माने, दिगंबर नाना पोकळे, पंडित पोकळे, हनुमंत झगडे, अनिल तावरे, गहीनाथ गाडे, उमेश मुरकुटे, सोपान शिंदे, हरी चंद्रकांत, सपकाळ सांगळे, बंडू पवार, निखिल नरोडे, बाबू दिंडे, सतीश विरकर, राम सांगळे, अण्णासाहेब पोकळे, ज्ञानेश्वर पोकळे, बाळासाहेब पोकळे, अविनाश पोकळे, राम मुटकुळे, प्रवीण श्रीखंडे, संदीप जगदाळे यांच्यासह पै.सतीश आबा मित्र मंडळ आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

वाढदिवस हक्काच्या नेतृत्वाचा!

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील युवकांच्या हृदयातील हक्काचं नेतृत्व पै. सतीश आबा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त युवकांच्या हिताचे उपक्रम दरवर्षी राबवले जातात याही वर्षी रक्तदान शिबिर व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. दि. ०४/०२/२०२६ रोजी पै. सतीश आबा शिंदे दिवसभर आष्टी येथे उपस्थित असणार आहे.

आबा ३६४ दिवस जनतेकडे जातात ; तर जनता हक्काने एक ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# अजित पवारांना सोबत घेताना मी फडणवीसांना बोललो होतो, 'एकदा विचार करा'-रवींद्र चव्हाण

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आली आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी अजित पवार पिंपरी-चिंचवडमध्ये आले होते. यावेळी त्यांनी पत्रकार परिषदेत भाजपवर जोरदार टीका करत भ्रष्टाचाराचा गंभीर आरोप केला होता. त्यांनी केलेल्या या आरोपांना आता भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.



रवींद्र चव्हाण म्हणाले, अजित पवार यांना सोबत घेत असताना मी देवेंद्र फडणवीसांना, 'पुन्हा एकदा विचार करा', असा सल्ला दिला होता. ही सर्व मंडळी कशा पद्धतीने आपल्यासोबत जोडली गेली आहेत, हे सर्वांना माहिती आहे. मी त्यावेळी देवेंद्र फडणवीस साहेबांना खासगीत नेहमी सांगायचो, 'साहेब थोडा विचार करा.' पुणे आणि पिंपरी-चिंचवडचे कार्यकर्ते मला रोज सांगत आहेत. त्यामुळे थोडासा विचार करा, असे मी त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांना बोललो होतो, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी म्हटले आहे. अजित पवारांच्या भ्रष्टाचाराचा गंभीर आरोपावर रवींद्र चव्हाण म्हणाले, सर्वप्रथम त्यांनी स्वत:च्या पक्षाकडे पाहिले पाहिजे. ते नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील पक्षाबद्दल बोलत आहेत, हे त्यांनी ध्यानात ठेवावे, अशा शब्दांत चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पुढे ते म्हणाले, खरं तर आरोप प्रत्यारोप कसे करावेत हे त्यांनी ठरवले पाहिजे. आम्ही कधी आरोप करायला गेलो तर त्यांना फार अडचणी निर्माण होतील, असा थेट इशारा देत याची त्यांनी काळजी घेतली पाहिजे, असे रवींद्र चव्हाण म्हणाले आहेत.

ऐन महापालिका निवडणुकीत पिंपरी चिंचवडमधील राजकीय वातावरण तापले असून, आरोप प्रत्यारोपाचे राजकारण भाजप राष्ट्रवादीमध्ये सुरू झाले आहे. अजित पवार यांच्या आरोपांनंतर रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या प्रत्युत्तरामुळे भाजप राष्ट्रवादी यांच्यात स्थानिक निवडणुकांवर आरोप प्रत्यारोपाचे राजकारण सुरू झाले आहे, अशी चर्चा रंगली आहे. रवींद्र चव्हाण पुण्यात आले होते त्यावेळी त्यांनी पत्रकार परिषदेतून अजित पवार यांनी केलेल्या आरोपांवर भाष्य केले. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे अनेक ठिकाणी हाय होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. भाजपसाठी पुणे महापालिका निवडणूक आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक अत्यंत महत्वाच्या आहेत. यावर भाष्य करताना रवींद्र चव्हाण यांनी यंदाची निवडणूक ही पुण्याच्या विकासासाठी आहे. येथील जनतेला नागरी सुविधा चांगल्या पद्धतीने कोण देऊ शकते, याचा प्रश्न आहे. हेच सांगायला मी इथे आलो आहे, असे ते म्हणाले. अजित पवार हे तसे चांगले आहेत. पण काही एजन्सी त्यांना खोटे नरेटिव्ह कसे पसरवायचे, यासाठी स्क्रिप्ट लिहून देतात. अजितदादांनी कोणता शर्ट घालायचा, यासाठीही एजन्सी सल्ला देते. पण अजित पवार हे आमच्यासोबत केंद्र आणि राज्यात जोडले गेले आहेत. पिंपरी-चिंचवडच्या महानगरपालिका निवडणुकीत त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. अजित पवार हे एजन्सीने त्यांना सल्ला दिल्याशिवाय खोटे आरोप करणार नाहीत.

# एसटी आगारांत महिला सुरक्षारक्षकांची नेमणूक

**पिंपरी । प्रतिनिधी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एस.टी. ने प्रवासादरम्यान चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत होती. गर्दीच्या वेळी आणि बसस्थानकांवर चोरट्यांकडून महिलांच्या मौल्यवान वस्तूवर डल्ला मारला जात होता. त्यामुळे एसटी प्रशासनाने महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा लक्षात घेऊन, अकरा सुरक्षारक्षकांची नेमणूक केली आहे. स्वारगेट, वाकडेवाडी आणि पिंपरी-चिंचवड या आगारात प्रत्येकी तीन महिला सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे महिला प्रवाशांना आता सुरक्षितरित्या प्रवास करता येणार आहे.

पुण्यातून स्वारगेट, वाकडेवाडी आणि वल्लभनगर आगार येथून राज्याच्या विविध भागात दीड हजारापेक्षा आधिक गाड्यांची ये-जा असते. त्यामुळे या स्थानकात प्रवाशांची कायम गर्दी असते. या गर्दीचा गैरफायदा घेत चोरटे महिलांचे दागिने पर्सवर डल्ला मारतात. त्यामुळे महिलांना प्रवासास निघण्यापूर्वीच आर्थिक फटका बसतो.

महिला सन्मान योजनेत तिकिटात महिलांना ५० टक्के सवलत मिळत असल्यामुळे महिलांची एस.टी.ला मोठी पसंती आहे. पण एकीकडे निम्म्या तिकिटात प्रवास करण्यासाठी गर्दी करणाऱ्या महिलांच्या दागिन्यांची शिवाजीनगर, स्वारगेट आगारांतून चोरी होत आहे. त्यामुळे महिलांना प्रवासात आर्थिक फटका बसत आहे. तसेच आगार परिसरात विद्यार्थिनींशी गैरवर्तन, प्रवाशांना मारहाण, असे प्रकार घडत आहे. एसटी महामंडळाने प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने स्वारगेट, वाकडेवाडी आणि पिंपरी- चिंचवड आगारात सीसीटीव्ही आणि सुरक्षारक्षक नेमले आहे. आगार परिसरात महिला सुरक्षा रक्षकांकडून सतत गस्त आणि संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जाणार आहे. महिलांची छेडछाडप्रकरणी हस्तक्षेप करणे, तसेच गरजू महिलांची मदत करणे इत्यादी कामे महिला सुरक्षारक्षक करणार आहेत.

# बिबट्यांना आता 'वनतारा'चा आधार; ५० बिबटे गुजरातला हलवण्यास केंद्राची मंजुरी

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाने (सीझेडए) १९ डिसेंबर रोजी महाराष्ट्रातील जुन्नर वन विभागातील ५० वन्य बिबट्यांना गुजरातमधील वनतारा येथील सुविधेत स्थलांतरित करण्यास मंजुरी दिली. ही मंजुरी केवळ वन्य बिबट्यांसाठी लागू आहे. हे प्राणी जुन्नर वनक्षेत्रातील मानव-वन्यजीव संघर्षाच्या भागातून अलीकडेच पकडण्यात आले आहेत. हे स्थलांतर टप्प्याटप्प्याने केले जाईल, असे वरिष्ठ वन अधिकाऱ्याने सांगितले.




जुन्नर वनक्षेत्रात मानव-बिबट्या संघर्षात मोठी वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे, येथे या वर्षी एप्रिलपासून सहा मानवी मृत्यूची नोंद झाली. त्यामुळे वन विभागाने जुन्नर, शिरूर, आंबेगाव आणि खेड तालुक्यांमध्ये बिबट्यांना पकडण्याची मोहीम सुरू केली. गेल्या दोन महिन्यांत विभागाने १२० बिबट्यांना पकडले आहे. यापैकी ५० बिबटे सध्या जुन्नर येथील माणिकडोह बिबट्या बचाव केंद्रातील (एमएलआरसी) पिंजऱ्यांत ठेवले आहेत, तर उर्वरित ७० बिबट्यांना लहान तात्पुरत्या पिंजऱ्यांमध्ये ठेवले आहे. एमएलआरसीची क्षमता केवळ ४५ बिबट्यांची आहे.बचाव केंद्र क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेने कार्यरत असल्याने, जुन्नर वनविभागाने जामनगर प्राणीसंग्रहालय अधिकाऱ्यांशी प्राथमिक चर्चा करून ५० बिबट्यांना गुजरातमध्ये स्थलांतरित करण्याच्या परवानगीसाठी ऑक्टोबरमध्ये सीझेडएकडे प्रस्ताव सादर केला. केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाचे (सीझेडए) सदस्य सचिव क्लेमेंट बेन यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, महाराष्ट्र वन विभागाच्या मुख्य वन्यजीव रक्षकांनी जुन्नर वन विभागातील ५० वन्य बिबट्यांना जामनगर, गुजरात येथील ग्रीन्स प्राणीशास्त्रीय बचाव आणि पुनर्वसन केंद्रात हस्तांतरित करण्यासाठी सादर केलेला प्रस्ताव सीझेडएच्या ११६ व्या तांत्रिक समितीसमोर ठेवण्यात आला. हस्तांतरणासाठी मंजूर झालेल्या ५० बिबट्यांपैकी २० नर आणि ३० मादी आहेत.

# म्हाडाच्या सव्वा चार हजार घरांच्या सोडतीला आचारसंहितेचा फटका

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने (म्हाडा) विविध योजनांसाठी काढलेल्या सुमारे सव्वा चार हजार घरांच्या सोडतीला महापालिका निवडणुकीच्या आचारसंहितेचा फटका बसला आहे. सोडत काढण्यास राज्य निवडणूक आयोगाने अखेर परवानगी नाकारली आहे.

या सोडतीतून होणाऱ्या घरांचे वाटप लकी ड्रॉ पद्धतीने केले जाणार असल्याने स्थानिक नागरिक प्रभावित होऊ शकतात, यासाठी ही सोडत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर जाहीर करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. याबाबत म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव यांनी आयोगाकडे परवानगी मागितली होती. आता ही सोडत फेबुवारीतच जाहीर होण्याची शक्यता आहे. म्हाडाने पुणे, पिंपरीसह सांगली व सोलापूर जिल्ह्यांत ४ हजार १६८ घरांची सोडत काढली आहे. या सोडतीसाठी २ लाख १५ हजार ८४७ अर्ज आले आहेत. पूर्वीच्या वेळापत्रका नुसार ही सोडत ११ डिसेंबरला काढण्यात येणार होती. मात्र, त्यानंतरही सोडत काढली नाही. त्यानंतर म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव यांनी ही सोडत १६ किंवा १७ डिसेंबरला काढण्यात येईल असे सांगितले होते. मात्र, त्याच आठवड्यात महापालिकांच्या निवडणुकीसाठी आचारसंहिता लागली. त्यामुळे ही सोडत काढता आली नाही.

# पेसा कायदा धाब्यावर? भीमाशंकर अभयारण्य क्षेत्रात ग्रामस्थ आक्रमक

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

वनहक्क कायदा व पेसा कायद्यानुसार ग्रामसभा सर्वोच्च असतानाही प्रत्यक्ष अंमलबजावणीत ग्रामसभेचे अधिकार सातत्याने डावलले जात असल्याचा गंभीर आरोप भीमाशंकर परिसरातील विविध गावांतील ग्रामस्थांनी केला आहे.भीमाशंकर अभयारण्य क्षेत्रातील वनहक्क, पेसा कायदा, ग्रामपरिस्थितीकी विकास समित्या, पर्यटन तसेच युवक रोजगार या महत्त्वाच्या विषयांवर नुकतीच म्हातारबाची वाडी (ता. आंबेगाव) येथे सहा गावांतील ग्रामस्थांची एकत्रित बैठक पार पडली.



या बैठकीस सुमारे ४० ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी बोलताना ग्रामस्थांनी स्पष्टपणे नमूद केले की, कायद्यानुसार ग्रामसभा सर्वोच्च निर्णय संस्था असतानाही वनसंरक्षणाच्या नावाखाली राबविण्यात येणार्या विविध कामांमध्ये ग्रामसभेची पूर्वसंमती घेतली जात नाही. तसेच या कामांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असून निधीच्या वापराबाबतही संभ्रम निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर येत्या ६ जानेवारी २०२६ रोजी भीमाशंकर येथे उपवनसंरक्षक यांच्या उपस्थितीत सर्व संबंधित गावांची संयुक्त बैठक घेण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे. या बैठकीत ग्रामपरिस्थितीकी विकास समित्यांचे दस्तावेज, निधीचा वापर, सामाजिक लेखापरीक्षण तसेच पेसा व वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. ग्रामसभेची पूर्वसंमती न घेता कोणतीही योजना किंवा काम राबविणे यापुढे स्वीकारले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा ग्रामस्थांनी वनविभागाला दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास कायदेशीर व लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या बैठकीस खेम पारधी, भीमराव साळवे, शंकर वडेकर, खंडू बाणेरे, सुरेश काठे, सुभाष डोळस, दत्ता आसवले, बाळू तिटकारे, श्रावण हिले, प्रदीप डामसे, सचिन कारोटे, कैलास धादवड, अक्षय वीरनक, आशिष आसवले यांच्यासह भोरगिरी, भीमाशंकर, येळवळी, निगडाळे, साकेरी, कोंढवळ, आहुपे आदी गावांतील मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

# मुलीच्या आजारपणाच्या नैराश्यातून आईचे टोकाचे पाऊल; चिमुरडीसह जीवन संपवले

**पुणे । प्रतिनिधी**

अस्थिविकार असलेल्या दोन वर्षाच्या मुलीचा दोरीने गळा आवळून खून करत आईने गळफास घेत आत्महत्या केली. वारजेमधील गोकुळनगरमध्ये हा प्रकार घडला.

शारवी आदिनाथ देवडकर (वय २) आणि तिची आई छाया (वय २८) अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहे. याबाबत आदिनाथ संताराम देवडकर (वय ३०, रा. कारगिल फार्म हाऊसजवळ, गोकुळनगर पठार, वारजे माळवाडी) यांनी वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पत्नी छाया देवडकर मुलीचा खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदिनाथ देवडकर हे पत्नी छाया आणि मुलगी शारवी असे गोकुळनगर पठार परिसरात राहायला आहेत. शारवीला अस्थिविकार असल्याचे निदान झाले होते. त्याबाबत उपचार सुरू होते. मुलीला झालेल्या या आजारामुळे छाया नैराश्यात होत्या. शुक्रवारी (ता.२ ) आदिनाथ कामानिमित्त बाहेर पडले होते. दुपारी दीडच्या सुमारास ते कामावरून घरी आले. त्यावेळी शारवी त्यांना घरातील पाळण्यात निपचित पडलेली दिसली. तिचे हात पाय चिकटपट्टीने बांधण्यात आलेले होते. तसेच पत्नी छायाने गळफास घेतल्याचे त्यांनी पाहिले. त्यामुळे घाबरलेल्या आदिनाथ याने पोलिसांकडे धाव घेतली. या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलिस आयुक्त जानवे, पोलीस निरीक्षक धेंडे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. दोघींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारांपूर्वीच दोघींचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. शारवीचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे प्राथमिक तपासणीत उघडकीस आले.

# निवडणूक जाहीर होण्याआधीच खेडमध्ये

## प्रचाराचा धुरळा; ध्वनी प्रदूषणाने नागरिक हैराण

**खेड । प्रतिनिधी**

खेड तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची अधिकृत घोषणा होण्याआधीच इच्छुक उमेदवारांनी प्रचाराचा सपाटा सुरू केला असून, त्यातून ध्वनीप्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कोणतीही शासकीय परवानगी न घेता गावोगावी फिरणार्या प्रचार वाहनांमुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास, रुग्णांचे उपचार तसेच ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.





सध्या दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या सराव परीक्षा सुरू असताना सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत पिकअप, टेम्पो व अन्य प्रचार वाहनांवरून मोठ्या आवाजात लाऊडस्पीकर वाजवले जात आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होत असून ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा, वस्त्या तसेच रुग्णालय परिसरातही नियमबाह्य प्रचार सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार कार्यकर्ते पै. बाळासाहेब चौधरी यांनी प्रशासनाविरोधात ठाम भूमिका घेत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. निवेदनात परवानगीविना व नियमांचे उल्लंघन करून सुरू असलेला प्रचार रोखण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. ध्वनी प्रदूषण नियंत्रण कायदा, निवडणूक आचारसंहिता तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशांनुसार शाळा, रुग्णालय परिसरात व रात्रीच्या वेळेत मोठ्या आवाजातील प्रचारास बंदी आहे. मात्र खेड तालुक्यात हे सर्व नियम धाब्यावर बसवले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवर्यात सापडली असून, नियम सर्वसामान्यांसाठीच का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. पै. बाळासाहेब चौधरी हे पुणे जिल्हा भारतीय जनसंसदचे अध्यक्ष तसेच खेड तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष असून, त्यांनी या प्रश्नाला सामाजिक व सार्वजनिक स्वरूप देत तात्काळ कारवाई, प्रचार वाहने जप्त करणे आणि दंडात्मक कारवाई करण्याची ठाम मागणी केली आहे.

# हिंगणीगाडा येथे गीर गाईचा पाडला फडशा

**पुणे । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यात बिबट्याचे हल्ले थांबता थांबेना. हिंगणीगाडा येथे शनिवारी (ता.३)पहाटे बिबट्याच्या हल्ल्यात गीर गाईचा मृत्यू झाल्याची घटना घडली. काही दिवसापासून या भागात बिबट्याचे दर्शन घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने तत्काळ पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



दौंड तालुक्यात अनेक भागात बिबट्याचा उपद्रव वाढला आहे. हिंगणीगाडा परिसरात शेतकऱ्यांना मागील काही दिवसापासून बिबट्या सदृश प्राण्याचे दर्शन घडत आहे. याबाबत त्यांनी वन विभागाला कळवले होते. शनिवारी पहाटे बिबट्याने चांगलाच धुमाकूळ घातला. नीलेश लोंढे यांचे शेतात राहते घर आहे. घराच्या समोर बांधलेल्या गीर गाईवर बिबट्याने हल्ला केला. यामध्ये गाईचा जागीच मृत्यू झाला. बिबट्याने गाईच्या शरीराचे काही भागाचा फडशाही पाडला आहे.लोंढे यांना सकाळी उठल्यानंतर गाई मृत अवस्थेत दिसून आली. गाईच्या मानेला प्रचंड मोठ्या आकाराच्या चावा घेतल्याच्या जखमा होत्या. याबाबत त्यांनी वनविभागाशी संपर्क साधला. दुपारी वनरक्षक रामेश्वर तेलंग्रे, बाळासाहेब कोकरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. घटनास्थळी आढळलेले ठसे बिबट्याचेच असल्याचे वनरक्षक यांनी मान्य केले. दौंड वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांच्या आदेशाने वनरक्षक तेलंग्रे यांनी आवश्यक ठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावले. सद्या शेतीची कामे सुरू आहे. दरम्यान, बिबट्याच्या भीतीने शेतीची कामे खोळंबली आहेत. वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल काळे म्हणाले की, " नागरिकांनी सतर्क राहावे. पाळीव प्राणी सुरक्षित ठिकाणी बांधावे."

# खोपोलीतील माजीनगरसेवक मंगेश काळोखेंचा सुपारी देवून खून; पुण्यातून अटक आरोपीची कबुली

**पुणे । प्रतिनिधी**

खोपोलीमधील माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांच्या खून प्रकरणातील पसार आरोपीला वानवडी पोलिसांनी अटक केली आहे. हडपसरमधील हांडेवाडी भागात ही कारवाई करण्यात आली. आरोपीने त्याच्याबरोबर असलेल्या दोन साथीदारांसह काळोखे यांचा सुपारी घेऊन खून केल्याची कबुली दिली.



खालीद खलील कुरेशी (वय २३, रा. सय्यदनगर, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. हडपसरमधील रामटेकडी औद्योगिक वसाहतीत एका ज्येष्ठ नागरिकाला मारहाण करून त्यांच्याकडील सोनसाखळी हिसकाविण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना उमर नूर खान, साहिल हबीब फकीर यांना अटक करण्यात आली होती. दोघांची चौकशी करण्यात आली. तेव्हा खालीद कुरेशी हा खून करून पसार झाल्याची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर पोलिसांनी खालीद कुरेशीचा शोध सुरू केला.

तपासात खालिद हडपसरमधील हांडेवाडी भागात येणार असल्याची माहिती वानवडी पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलिस उपनिरीक्षक अल्फाज शेख, सहायक निरीक्षक उमाकांत महाडिक यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला सापळा लावून ताब्यात घेतले. चौकशीत खालिदने खोपोलीतील माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांचा दोन मित्रांशी संगनमत करून खून केल्याची कबुली दिली. काळोखे यांचा खून करण्यासाठी त्यांना एकाने सुपारी दिल्याची माहिती दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक भाऊसाहेब पाटील, गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक संगीता जाधव, सहायक निरीक्षक उमाकांत महाडिक, उपनिरीक्षक अल्फाज शेख, सर्फराज देशमुख, दया शेगर, महेश गाढवे, अतुल गायकवाड, अमोल पिलाणे आणि विठ्ठल चोरमले यांनी ही कारवाई केली.

# भाजपवर टीका करण्याची आपल्याला गरज नाही, ते काम अजित पवार करतात; उदय सामंत यांचा टोला

**पुणे । प्रतिनिधी**

आपला पक्ष हा पुण्याच्या विकासावर बोलणारा आहे, तर त्यामुळे आपण कुणावरही टीका करायची नाही. टीका करण्याचं आपलं काम हे अजित पवार (- क्षळीं झुरी) पूर्ण करत आहेत असा टोला उदय सामंत (णवरू डारपीं) यांनी भाजपला लगावला. आपल्या मित्रपक्षाला वाटत होतं आपण उमेदवार उभे करू शकणार नाही, पण काही तासातच आपण १२० उमेदवार उभे केले. आता पुण्याचा महापौर आपल्या मदतीशिवाय होऊ शकणार नाही असा विश्वासही उदय सामंत यांनी व्यक्त केला. उदय सामंत यांनी पुण्यात शिवसेनेच्या प्रचाराचा नारळ फोडला.



शिवशक्ती विरुद्ध धनशक्ती असा सामना पुण्यात होत आहे. आपल्या समोर धनशक्ती आहे, आम्ही कुणावर बोलत नाही किंवा एका पक्षाचे नाव आम्ही घेतलं नाही अशी टीका उदय सामंत यांनी नाव न घेता भाजपवर केली. सगळीकडे आपलं वातावरण आहे. शिवसेनेला आशीर्वाद द्यायचं वातावरण पुण्यात आहे. उमेदवारांना माझी विनंती आहे, आपल्याला कुणावर टीका करायची गरज नाही, आपलं टीका करण्याचं काम अजित पवार पूर्ण करत आहेत. त्यामुळे आपल्याला काही बोलायची गरज नाही असं उदय सामंत म्हणाले.

उदय सामंत म्हणाले की, इतिहासात पहिल्यांदाच शिवसेना पुण्यात १२० जागांवर लढत आहे. उमेदवारांचा आत्मविश्वास बघितल्यानंतर १६ तारखेला जो निकाल लागेल त्यावेळी महापौर बनवत असताना आपल्याला विचारात घ्यावंच लागेल अशी परिस्थिती आहे. पुणे शहर बाळासाहेबांचं आवडतं शहर होतं. विकासाचा मुद्दा घेऊन पुढे जाणं महत्वाचं आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी केलेली कामे जनतेपर्यंत पोहोचवा. उदय सामंत म्हणाले की, संघर्ष आपल्या पाचवीला पुजलेला आहे. आपण घराघरांपर्यंत पोहोचू. तीन-तीन चार-चार वेळा लोकांच्या घरी जाऊ. काही नवे उमेदवार आपण दिले आहेत. २००४ मध्ये मी निवडणूक तरुण म्हणून लढलो होतो आणि त्यावेळी पराभव झाला होता. आज पाचवेळा मी आमदार झालो आहे. म्हणून जनता तरुणांच्या मागे असते. भाजप आणि शिवसेना ही नैसर्गिक युती आहे ही टिकली पाहिजे असं आमचं म्हणणं होतं. पण काही लोकांचा गैरसमज होता की, आम्ही ४० देखील उमेदवार उभे करू शकणार नाही. आम्हाला वेळ कमी पडला नाहीतर आपण १६५ उमेदवार उभे केले असते असा टोला सामंत यांनी भाजपला लगावला. समोरच्या लोकांनी टीका केली तर त्याला विकासातून उत्तर द्या. ही लढाई विकासाची आणि विश्वासघाताची आहे आहे. पुण्यात शिवसेनेची खरी ताकद काय आहे हे दाखवून द्या. पुढचे १४ दिवस अहोरात्र काम करा असं आवाहन सामंत यांनी शिवसैनिकांना केलं. उदय सामंत म्हणाले की, निवडणुकीचे सगळे निर्णय आपण एका तासात घेतले आहेत. पुण्यात जर आपण ताकद लावली तर एक नंबरचा पक्ष शिवसेना असेल. पण काही लोक कमी लेखत आहेत, त्यांच्यावरती बोलायला नको. आज अशी निवडणूक लढू की पाच वर्षात १६५ पैकी १२० जागा आपण जिंकल्या पाहिजे.